आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । घाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १२५ । रविवार १५ फेब्रुवारी २०२६ । पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



महाशिवरात्री निमित्त हार्दिक शुभेच्छा..

# ‘टिपू सुलतान हे शिवाजी महाराजांच्या समकक्ष योद्धे होते’

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांच्या वक्तव्याने वादाचा भडका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मालेगाव :** ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्य असा विचार दिला, अगदी त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी त्याच समकक्ष काम केले आहे. त्यामुळे टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे वक्तव्य काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. मालेगाव महानगरपालिकेतील उपमहापौरांच्या दालनातील टिपू सुलतानाच्या छायाचित्रावरुन वाद निर्माण झाला असताना हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याने या आगीत आणखी तेल ओतले जाण्याची शक्यता आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचं शौर्य ज्याप्रकारचं आहे, त्यांनी जो स्वराज्या विचार दिला, त्याच मांदियाळीत, त्यांच्यानंतर बऱ्याच वर्षांनी टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्याविरोधात



लढा पुकारला होता. त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे युद्ध होऊ गेले, भारताचे भूमिपूत्र होऊन गेले, त्यांनी कधीही कोणत्याही विषारी, विखारी विचारांना जवळ केले नाही. त्यामुळे शौर्याचे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांच्याकडे शिवाजी महाराजांच्या समकक्ष पाहिले पाहिजे, असे वक्तव्य हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. हर्षवर्धन सपकाळ यांच्या या वक्तव्यावर भाजपच्या नेत्यांनी टीकेची झोड उठवली आहे.

### असं जोडे चाटणं मी या जन्मात बघितलेलं नाही



**छत्रपती शिवरायांनी स्वराज्य स्थापन करुन मोघलांच्या जोखडातून सामान्य माणसाला मुक्त करण्याचं काम केलं. खऱ्या अर्थाने सामान्य रयतेचं राज्य उभरणारे छत्रपती शिवराय होते. हजारो, लाखो हिंदुंची हत्या करणारा टिपू सुलतान याची तुलना करुन दोघांनाही सारखा सन्मान द्या म्हणणं, यापेक्षा जास्त लांगुलचालन, जोडे चाटणं मी या जन्मात बघितलेलं नाही. आम्ही हे सहन करणार नाही. टिपू सुलतान आणि छत्रपती शिवरायांची तुलना केली याबद्दल त्यांनी माफी मागितली पाहिजे. अशा पद्धतीने ते बोलत असतील आणि काँग्रेस पक्षामध्ये थोडीही नैतिकता राहिली असेल तर त्यांनी भूमिका स्पष्ट केली पाहिजे. त्यांच्या मित्रपक्षांनीही भूमिका स्पष्ट केली पाहिजे. – देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

हर्षवर्धन सपकाळ यांनी बुलढाण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना हे वक्तव्य केले. यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाबाबतही

**टिपू सुलतान हे इंग्रजांविरोधात लढणारे स्वातंत्र्ययोद्धे होते. भाजपच्या एका खासदारांनीही याबाबत विधान केले होते. महाराष्ट्र सरकारच्या एका राजपत्रात (गॅझेट) त्यांच्या जयंतीचा उल्लेख आहे. मग विरोध करणारे नेमके कोण आणि कशासाठी? – उपमहापौर शान–ए–हिंद, मालेगाव**

भाष्य केले. नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात ५० हजाराची लाच घेतली, हे प्रकरण फार छोटं आहे. हे संपूर्ण सरकारच लाचखोर आहे. नरहरी झिरवल यांच्यावर कारवाई तर व्हायलाच पाहिजे पण कोट्यावधी रुपये खाणारे देवेंद्र फडणवीसनवर काय कारवाई करणार हे आधी सांगा, या असंवैधानिक सरकारचा आम्ही निषेध (पान ४ वर)

## महत्त्वाचे..

### अग्निवीर भरतीसाठी ऑनलाइन नोंदणी सुरू

अहिल्यानगर : देशसेवेचे स्वप्न पाहणाऱ्या तरुण-तरुणींसाठी भारतीय सैन्याने आनंदाची बातमी दिली आहे. भारतीय सैन्यातर्फे 'अग्निवीर' भरतीसाठी अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली असून, देशभरातून २५ हजारांहून अधिक रिक्त पदांसाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. विशेष म्हणजे, या भरतीमध्ये अविवाहित पुरुष आणि महिला अशा दोन्ही उमेदवारांना सहभागी होता येणार आहे.

या भरती अंतर्गत अग्निवीर जनरल ड्युटी, अग्निवीर टेक्निकल, अग्निवीर लिपिक / स्टोअर कीपर टेक्निकल आणि अग्निवीर ट्रेड्समन (८वी आणि १०वी उत्तीर्ण) जागा भरल्या जाणार आहे. उमेदवारांची निवड दोन टप्प्यांत होणार आहे. उमेदवारांना सर्वप्रथम सर्व उमेदवारांना संगणक-आधारित ऑनलाइन परीक्षा द्यावी लागेल. ही परीक्षा बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित असेल. त्यानंतर ऑनलाइन परीक्षेतील गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार केली जाईल. पात्र उमेदवारांना शारीरिक चाचणी आणि भरती रॅलीसाठी बोलावले जाईल.

महत्त्वाचे म्हणजे, लिपिक आणि स्टोअरकीपर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना टायपिंग चाचणी देणे अनिवार्य आहे. यामध्ये इंग्रजी टायपिंगचा वेग प्रति मिनिट किमान ३० शब्द असणे आवश्यक आहे.

# भारत-पाकिस्तान आज एकमेकांना भिडणार!

## आयसीसी टी-२० विश्वचषकाचा सामना रंगणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोलंबो :** वादळ शांत झालंय तणाव निवळलाय आणि प्रतीक्षेच्या क्षणांचं काउंटडाउन आता संपत आलंय. ज्या सामन्याभोवती प्रचंड गदारोळ झाला, ज्याच्या आयोजनावरच प्रश्नचिन्ह उभं राहिलं होतं, ती महासंग्रामाची वेळ अखेर दारात येऊन ठेपली आहे. आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांची बहुप्रतीक्षित लढत रंगणार आहे. रविवार १५ फेब्रुवारी रोजी ग्रुप स्टेजमधील या सामन्यात दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. या स्पर्धेतील दोन्ही संघांचा हा तिसराच सामना असणार असून, जो संघ जिंकेल तो थेट पुढील फेरीत प्रवेश मिळवेल. त्यामुळे हा सामना म्हणजे जणू ‘करो या मरो’ अशीच स्थिती आहे.




काही दिवसांपूर्वी मात्र या सामन्यावर संकटाचं सावट दाटलं होतं. बांगलादेशच्या स्पर्धेबाहेर पडल्यावर पाकिस्तानने भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली होती. त्यामुळे क्रिकेटविश्वात खळबळ उडाली. जवळपास आठवडाभर चर्चा, बैठक आणि तोडग्यांच्या (पान ४ वर)

■ **भारतीय संघ :** सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, संजू सॅमसन, शिवम दुबे, इशान किशन, हार्दिक पांड्या, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रिंकू सिंग.

■ **पाकिस्तान संघ :** सलमान अली आगा (कर्णधार), अबरार अहमद, बाबर आझम, फहीम अशफ, फखर जमान, ख्वाजा मोहम्मद नफे, मोहम्मद नवाज, मोहम्मद सलमान मिर्झा, नसीम शाह, साहिबजादा फरहान, सईम अयुब, शाहीन शाह आफ्रिदी, शादाब खान, उस्मान खान आणि उस्मान तारिक.

## मुलगी पळविल्याची माहिती दिल्याच्या रागातून खून; एकास अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** भावाने पळवून नेलेल्या मुलीची माहिती तिच्या आईला का सांगितली, या कारणावरून झालेल्या वादातून फक्राबाद (ता. जामखेड) येथे एका व्यक्तीचा निर्घृण खून झाल्याची घटना घडली. त्यामुळे संपूर्ण जामखेड तालुक्यात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनमध्ये तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून एक आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे. शुक्रवारी (दि. १३) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास फक्राबाद शिवारातील झोपडपट्टी परिसरात तुकाराम सूर्यभान काळे (वय ५०) यांच्यावर तिघांनी चाकू व काठीने हल्ला केला. सागर व वैभव काळे यांनी चाकूने तर तुळसाबाई काळे यांनी काठीने मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. गंभीर जखमी अवस्थेत तुकाराम काळे यांना खासगी रुग्णवाहिकेतून जामखेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी (पान ४ वर)

# मुलुंडमध्ये मेट्रोचा स्लॅब कोसळला

## ऑटो अन् कारचा चेंदामेंदा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

### एकाचा मृत्यू, अनेक जखमी

**मुंबई :** मुंबई: मुंबईतील मुलुंड (पश्चिम) परिसरात आज शनिवारी दुपारी मेट्रो बांधकामादरम्यान गंभीर अपघात घडला. एलबीएस रोडवरील बांधकाम सुरू असलेल्या मेट्रो पिलरचा सिमेंटचा एक भाग अचानक तुटून खाली पडला. हा तुकडा रस्त्यावरून जात असलेल्या ऑटो रिक्षा आणि एका कारवर कोसळला. ही घटना जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ घडली. प्राथमिक माहितीनुसार, दुपारी सुमारे १२.२० वाजता या अपघाताची माहिती संबंधित यंत्रणांना मिळाली. या दुर्घटनेत ऑटोमध्ये प्रवास करणाऱ्या तीन ते चार जण जखमी झाले.

त्यातील एकाचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार मुलुंड येथील लाल बहादूर शास्त्री ( LBS Road) मार्गावर गेल्या अनेक महिन्यांपासून मेट्रो मार्गिकेचे काम सुरु आहे. त्यासाठी याठिकाणी दररोज भलेमोठे गर्डर आणि स्लॅब वरती चढवण्याचे काम सुरु असते. आज शनिवारी मेट्रोचा एक स्लॅब खाली कोसळला. त्यावेळी खालच्या एलबीएस रोडवरुन वाहने ये-जा करत होती. हा स्लॅब एका ऑटो रिक्षावर आणि कारवर कोसळला आहे. स्लॅबच्या खाली आलेल्या वाहनांच्या भागाचा चेंदामेंदा झाला आहे. हा स्लॅब कोसळला तेव्हा रिक्षातून तीन जण आणि ड्रायव्हर प्रवास करत होते. हे चार जण अपघातामध्ये जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्लॅबच्या खाली दबून वाहनांचा झालेला चेंदामेंदा बघता जखमींपैकी काहीजण दगावल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# चार जिल्ह्यांमध्ये हृदयविकार उपचार केंद्रांसाठी १०० कोटींचा निधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यात पुण्यासह जालना, गडचिरोली व कोल्हापूर या चार जिल्ह्यांमध्ये हृदय तपासणी व उपचार कक्ष (कार्डियाक कॅथलॅब) उभारणीस सार्वजनिक आरोग्य विभागाने मंजुरी दिली आहे. त्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला आहे.

पुण्यात ही 'कॅथलॅब' औंध जिल्हा रुग्णालयात कार्यान्वित होईल. हा प्रकल्प हृदयविकार असलेल्या रुग्णांसाठी दिलासादायक ठरणार आहे. प्रकल्पात अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी हे उपचार मोफत होतील. त्याचबरोबर हृदयाची झडप (व्हॉल्व) व हृदयाचे ठोके नियमित राखण्यासाठी हृदयात बसवले जाणारे 'पेसमेकर' हे उपकरण बसवता येईल. या प्रकल्पाची अंमलबजावणी 'ईपीसी' पद्धतीने करण्यात येणार असून यामध्ये कॅथलॅब उभारणीसाठी आवश्यक असलेली संरचनात्मक रचना, यांत्रिकी, विद्युत, प्लंबिंग आराखडे, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांची खरेदी, उभारणी, चाचणी, साठवण, वितरण तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन या सर्व बाबींचा समावेश राहील. आतापर्यंत हृदयविकाराच्या गंभीर रुग्णांना अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टीसारख्या तपासण्या व उपचारांसाठी खासगी रुग्णालयात जावे लागत होते. त्यामुळे रुग्णांच्या उपचारात विलंब होण्याबरोबरच आर्थिक भार आणि मानसिक तणावही वाढत होता. ही बाब लक्षात घेऊन शासनाने जिल्हा रुग्णालयांमध्ये 'कार्डियाक कॅथलॅब' उभारण्याचा निर्णय घेतला आहे. अत्यल्प खर्चात उच्च दर्जाचे उपचार या प्रकल्पाची

**राज्यात हृदयविकार व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. या रुग्णांना वेळेवर निदान व उपचार मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी ही कॅथलॅब उपयुक्त ठरणार आहे. औंध जिल्हा रुग्णालयात ही कॅथलॅब कार्यान्वित होणार आहे.**
**– डॉ. नागनाथ यम्पल्ले, जिल्हा शल्यचिकित्सक**



अंमलबजावणी जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य सेवा संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने होणार आहे. यामुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यांमधील अडथळे तातडीने शोधणे व त्यावर त्वरित उपचार करणे शक्य होणार असून, हृदयविकाराच्या रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाच्या 'गोल्डन अवर'मध्ये उपचार उपलब्ध झाल्याने अनेकांचे प्राण वाचण्यास मदत होइल. शासकीय रुग्णालयात ही सुविधा सुरू झाल्यानंतर जिल्हा रुग्णालयातील आरोग्यसेवा अधिक सक्षम व आधुनिक होणार असून, सामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना अत्यल्प खर्चात उच्च दर्जाचे हृदयविकार उपचार मिळणार आहेत.

# बाजारातून तरुणीचे अपहरण; पोलिसांच्या तत्परतेने दोन तासांत सुटका



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यातील शिरापूर येथील तरुणीला तिसगाव येथून जबरदस्तीने चारचाकी गाडीत ढकलून अहिल्यानगरच्या दिशेने पळवून नेण्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास घडली. मुख्य बाजारपेठेत भरदिवसा घडलेल्या या प्रकारामुळे तिसगाव परिसरात एकच खळबळ उडाली. शिरापूर येथील तरुणी कामानिमित्त तिसगाव येथे आली असताना तिच्यावर आधीपासूनच पाळत ठेवण्यात आली होती. रस्त्याच्या कडेला दोन चारचाकी वाहने उभी होती.

तरुणी किराणा दुकानासमोर येताच स्कॉर्पिओमधून खाली उतरलेल्या एका महिलेसह इतर काही व्यक्तींनी तिला जबरदस्तीने गाडीत ढकलून वेगाने पळ काढला. तरुणीने आरडाओरड करण्याचा प्रयत्न केला. आवाज ऐकून काही तरुण गाडीच्या दिशेने धावले, मात्र मुलीला गाडीत बसवणाऱ्या महिलेने उपस्थितांना ती मेंटल आहे असे (पान ४ वर)

**घटनेची माहिती मिळताच काही वेळातच शिरापूर येथील तरुणीचे आई-वडील घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पडलेली मुलीची चप्पल पाहताच आईची खात्री पटली आणि तिने हंबरडा फोडला. घटनेची माहिती मिळताच पोलीस तातडीने सक्रिय झाले. पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली आरोपींच्या वाहनांचा वेगाने शोध सुरू करण्यात आला. ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली.**

# आता महामार्गांवरही हेल्मेटची सक्ती!

## टोल नाक्यांवर विनाहेल्मेट प्रवेश नाही, परिवहन विभागाचा निर्णय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नाशिक : वाढते अपघात रोखण्यासाठी नाशिकमध्ये हेल्मेटसक्तीची अपघाती मृत्यू लवकरच अंमलबजावणी करण्यात येणार आहे. महामार्गांवरही हेल्मेट अनिवार्य राहणार असून, टोल नाक्यांवरदेखील हेल्मेटशिवाय दुचाकीस्वारांना प्रवेश नसल्याचे फलक लागणार आहेत.

राज्यात गेल्यावर्षी रस्ते अपघातांमध्ये १५ हजार ५४९ नागरिकांचा मृत्यू झाला. त्यापैकी ५७टक्के मृत्यू दुचाकीस्वारांचे, तर २१ टक्के मृत्यू पादचाऱ्यांचे आहेत. या पार्श्वभूमीवर प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) राज्यात दुचाकीस्वार आणि पादचारी वाचवा अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत ही उपाययोजना करण्यात येणार आहे. राज्यातील रस्ते अपघातांचा, त्यामध्ये झालेल्या मृत्यूंचा आढावा प्रादेशिक परिवहन विभागाने नुकतेच घेतला.

जानेवारी ते डिसेंबर २०२५ या वर्षभरात महाराष्ट्रात ३६ हजार ४५० अपघात झाले. त्यामध्ये १५ हजार ५४९ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ३२ हजार १४७ नागरिक जखमी झाले. जागतिक स्तरावर सन २०३० पर्यंत रस्ते अपघातांतील मृत्यूंचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ते साध्य करण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने सन २०२६ हे वर्ष 'दुचाकीस्वार आणि पादचारी वाचवा अभियान' म्हणून राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांना सूचनांच्या तत्काळ अंमलबजावणीचे आदेश देण्यात आले आहेत. दुचाकीस्वारांना हेल्मेट वापराची सवय लागावी याकरिता या वर्षात महापालिका, नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या सहकार्याने तातडीने उपाययोजना हाती घेण्यात येणार आहेत. ज्या महामार्गांवर दुचाकींचे सर्वाधिक अपघात घडतात अशा जिल्ह्यातील पहिल्या तीन प्रमुख राष्ट्रीय व राज्य महामार्गावर हेल्मेटसक्तीची अंमलबजावणी होणार असून, त्यानंतर टप्प्याटप्प्याने अन्य अपघातप्रवण रस्त्यांवर अंमलबजावणी केली जाणार आहे.



■ **इंटरसेप्टर वाहनांचा वापर**

**दुचाकीस्वारांनी हेल्मेट परिधान केले आहे की नाही याची रडार आधारित इंटरसेप्टर वाहनांद्वारे तपासणी केली जाणार आहे. इंटरसेप्टर वाहनाचा वापर अंमलबजावणी व्यतिरिक्त कार्यालयीन कामकाजासाठी केला जाणार नाही, याबाबत कार्यालयप्रमुखांनी दक्षता घ्यावी असे निर्देशही परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिले आहेत. टोल नाक्यांवर दुचाकीस्वारांना टोल लागत नाही. डावीकडची एक लेन दुचाकीस्वारांसाठी खुली असते. तेथे 'हेल्मेट नाही, तर प्रवेश नाही' असा फलक लावण्यात येणार असून, तेथेच इंटरसेप्टर वाहनांचादेखील अंमलबजावणीसाठी वापर होणार आहे.**

## संपादकीय

# लोकशाही : केवळ शब्द नव्हे, तर जीवनपद्धती..!

लोकशाही ही केवळ राजकीय प्रणाली नव्हे, तर ती एक जीवनपद्धती आहे, असे वाक्य आपल्या भाषणांमधून अधूनमधून ऐकायला मिळते. पण ते वास्तवात कितीसे उतरते? उदारमतवाद, सहिष्णुता, मुक्त चिंतन ही तिची मूल्ये सार्वजनिक जीवनात, विशेषतः साहित्य-कला क्षेत्रात कितीसे दिसतात? आजची स्थिती पाहता, ही उक्ती केवळ भाषणातील अलंकारच राहिली आहे, असे वाटावे अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

साहित्य आणि कला हे प्रांत स्वभावतः स्वतंत्र असतात. ते राजकीय सत्तेच्या छायेत येऊ नये, अशी अपेक्षा असते. पण आज हे क्षेत्रे कमालीची राजकारणग्रस्त झाली आहेत. दोन प्रकारे ही प्रक्रिया स्पष्ट दिसते. एकीकडे, मुरलेल्या राजकारणातील डावपेच साहित्यसंस्थांमध्ये रुजले आहेत. दुसरीकडे, 'आपल्या विचारांच्या गटाने संस्था ताब्यात घ्यावी' या हेतूने सदस्यसंख्येची लढाई लढवली जाते. या दोन्ही प्रवृत्तींनी साहित्यिक वातावरणाला गढूळ केले आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीचे चित्र याचे उत्तम उदाहरण आहे. दहा वर्षांनी होणाऱ्या या निवडणुकीत 'निकोप स्पर्धा' हा शब्द वापरणे हा शब्दांशीच क्रूर खेळ ठरेल. एकूण १६ हजार ६०७ सभासदांपैकी अनेकांना निवडणूक होत असल्याचीही कल्पना नाही. परिणामी, अकरा जिल्ह्यांपैकी दहा जिल्ह्यांत बिनविरोध निवड झाली. टपाल मतपत्रिका गोळा करण्याचे 'बळ' कोणाकडे अधिक, यावरच निकाल ठरतो. संस्थेच्या कार्यालयातच महामंडळाचे कार्यालय असल्याने आणि पुढील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यात होणार असल्याने, मानसन्मान आणि पदांचे आमिषे खुणावत आहेत. मंत्री-आमदारांसह सत्ताधाऱ्यांनी थेट हस्तक्षेप केला. विरोधी आवाज दाबण्यासाठी आमिषे, प्रलोभने, दबाव आणि धमक्या यांचा वापर झाला. वार्षिक सभांमध्ये असंसदीय शब्द, बेताल आरोप-प्रत्यारोप आणि कज्जेदलाली यांचे साग्रसंगीत नाट्य पाहायला मिळाले.विदर्भ साहित्य संघाची स्थितीही वेगळी नाही. दोन दशकांनंतर निवडणूक झाली, तेव्हा राजकीय हस्तक्षेपाने पुन्हा एकदा साहित्यिकता मागे पडली. अध्यक्षपदासाठी अर्ज मागे घेण्याच्या वाटाघाटीत 'आपल्या' उमेदवारांना सामावून घेण्याच्या चाली रचल्या गेल्या. साहित्यिक की प्रशासक, उद्योजक-राजकारणी की राजकारणी-उद्योजक, अशा चर्चा झडल्या. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि सत्तेची हाव यांचा मुखवटा गळून पडला.

।मुंबईतील प्रख्यात एशियाटिक सोसायटीची निवडणूकही यातून सुटली नाही. तेथे संघर्षाला 'डावे विरुद्ध उजवे' असे उघड स्वरूप आले. मतदारनोंदणीवरून झालेले वाद न्यायालयात गेले आणि निवडणूक पुढे ढकलली गेली. ज्ञानक्षेत्रातील मातब्बर संस्थेवर ताबा मिळवण्यासाठी थेट राजकीय ध्रुवीकरण झाले.. या सगळ्या घटनांमधून एक गंभीर प्रश्न उभा राहतो : साहित्य अकादमीसारख्या संस्थांची स्वायत्तता झाकोळली जात आहे, असे जे आरोप होतात, त्यात तथ्य आहे. 'उजव्या' विचारसरणीच्या गटांनी संस्था ताब्यात घेण्याचा सपाटा लावला, असा एक आक्षेप वारंवार येतो. तो नाकारता येत नाही. पण दुसऱ्या बाजूला, समाजसत्तावादी डाव्या विचारधारेचा इतिहासही मुक्त चिंतनाला पायबंद घालण्याचा आहे. सेन्सॉरशिप, बहिष्कार, बौद्धिक दहशतवाद यांची उदाहरणे काय कमी आहेत? कोणी कोणाकडे बोट दाखवावे? दोन्ही बाजूंनी सत्तेच्या राजकारणाला साहित्यिक क्षेत्रात स्थान दिले आहे.

साहित्य आणि कला ही क्षेत्रे सर्जनशीलतेची, नवोन्मेषाची, मुक्त विचारांची असतात. त्यांना राजकीय रंग देणे म्हणजे त्यांची हत्या करणे होय. आज संस्थांमध्ये जो वातावरण तयार झाला आहे, तो खिन्न करणारा आहे. सदस्यसंख्येची लढाई, बिनविरोध निवडणुका, राजकीय हस्तक्षेप, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा यांमुळे साहित्यिक जीवनाची कारंजी आटत चालली आहे.

तरीही आशा अजूनही आहे. सर्जनशील साहित्यिक, कलाकार, विचारवंत यांच्या हातीच या क्षेत्रांची शुद्धीकरणाची जबाबदारी आहे. राजकीय सत्तेच्या पलीकडे जाऊन, साहित्याच्या स्वायत्ततेची, मुक्त चिंतनाची, सहिष्णुतेची जपणूक करणे हाच खरा लोकशाहीचा आदर्श आहे. गढूळलेले क्षितिज पुन्हा लखख करणे, सर्जनशीलतेची कारंजी पुन्हा उफाळून येणे, हाच एकमेव मार्ग आहे.

# मासिक स्वच्छता अभियानाअंतर्गत तीन टन कचऱ्याची विल्हेवाट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा नगरपंचायतचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांच्या संकल्पनेतून नेवासा शहरातील विविध परिसरात राबविण्यात आलेल्या मासिक स्वच्छता अभियानात तीन टन कचऱ्याची इतरत्र विल्हेवाट लावण्यात आली.या अभियानात सामाजिक क्षेत्रात काम करणारे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

यावेळी झालेल्या स्वच्छता अभियानामध्ये बाजार तळ परिसर,जिल्हा बँक परिसर,संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर रोड परिसर याठिकाणी जाऊन स्वच्छता दूतांनी स्वच्छता अभियानात सहभाग नोंदवला. नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांच्या संकल्पनेतून हे राबविण्यात येत असल्याने ते स्व:त या अभियानात हातात फावडे कुदळ घेऊन सहभागी झाले होते.

झालेल्या स्वच्छता अभियानात वृक्ष मित्र व सामाजिक कार्यकर्ते अमृत फिरोदिया,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाह सतीश मुळे सर,अनंता नळकांडे,जेष्ठ कार्यकर्ते गफूरभाई बागवान,रामभाऊ केंदळे,सोन्या चांदीचे व्यापारी बालेंद्र पोतदार,व्यापारी अब्बास बागवान, हमीद बागवान,संदीप आलवणे,युवा कार्यकर्ते संदीप भांड,आकाश देशमुख,योगेश आलवणे यांनी देखील या अभियानात सहभाग नोंदवून प्रतिसाद दिला.

स्वच्छता अभियानासाठी तीन कचरा गाड्या कचरा संकलन करण्यासाठी तैनात करण्यात आल्या होत्या.नगरपंचायत कर्मचाऱ्यांनी स्वच्छता अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मोलाची भूमिका बजावली

तीर्थक्षेत्र नेवासा या भूमीचे वैभव वाढीसाठी सर्व नेवासकर नागरिकांनी दर महिन्याच्या १२ तारखेला



सकाळी ७ ते ९ या वेळेत विविध परिसरात होणाऱ्या स्वच्छता अभियानात नेवासकर नागरिक या नात्याने सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी यावेळी बोलताना केले

# भालगाव शाळेत ग्रंथदिंडी काढून वाचनालय कक्ष सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** मराठी भाषेचा गौरव न करता शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय निर्माण व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद अहिल्यानगर च्या शिक्षण विभागामार्फत कुसुमाग्रज वाचन अभियान उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा भालगाव येथे शनिवारी ग्रंथदिंडी काढत कुसुमाग्रज बालवाचनालय व शिक्षक वाचनालयाचे उदघाटन करण्यात आले

यावेळी कुसुमाग्रज वाचन अभियान'' अंतर्गत वाढदिवसानिमित्त पुस्तके भेट

> भालगाव शाळेमध्ये सुरू झालेल्या कुसुमाग्रज वाचन अभियानांतर्गत विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ व पालक यांच्या वाढदिवसा निमित्ताने वाचन चळवळीस पुस्तके भेट देण्याचा संकल्प अत्यंत स्तुत्य आहे.विद्यार्थ्यांच्या वाचन संस्कृतीच्या जतनासाठी समाजाने पुढाकार घ्यावा.या अभियानाच्या माध्यमातून वाचन संस्कृतीची जोपासना केली जाणार आहे.
>
> **– डॉ.संजय कळमकर**
> **साहित्यिक**
> **प्रभारी गटशिक्षणाधिकारी पं.स. नेवासा**



देण्याचा विदयार्थी, शिक्षकांसह ग्रामस्थ यांनी वाचन चळवळीस प्रोत्साहन देण्याचा संकल्प केला.

अहिल्यानगर जिल्यात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू केलेल्या कुसुमाग्रज वाचन अभियान अंतर्गत भालगाव शाळेमध्ये सुरू केलेल्या वाचनालयाचे उदघाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश तनपुरे यांच्या हस्ते फीत कापून झाले. यावेळी व्यासपीठावर उपसरपंच बाळासाहेब आहेर,सोसायटीचे चेअरमन युवराज तनपुरे,पोलीस पाटील बाळकृष्ण भागवत, युवानेते गणेश कोरडे,सदस्य अरुण खरात उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी आरोपीस जन्मठेप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** अल्पवयीन मुलीस फूस लावून कायदेशीर रखवालीतून पळवून नेत जबरदस्तीने लॉजवर नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध पार्श्वीय लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी ज्ञानेश्वर भास्कर तारडे (वय ४०, रा. सुरेगाव गंगा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) यास विशेष न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) व भारतीय दंड विधान संहिता अंतर्गत हा निकाल देण्यात आला. हा निर्णय विशेष न्यायाधीश आर. आर. हस्तेकर यांनी दिला.

घटनेची थोडक्यात माहिती अशी की, पीडित अल्पवयीन मुलगी कॉलेजला स्कुटीवर ये-जा करत होती. घटनेच्या दिवशी आरोपीने 'मलाही त्याच दिशेला काम आहे' असे सांगून तिला मोटारसायकलवर बसवले. मात्र कॉलेजवर न सोडता बळजबरीने तिला दुसऱ्या गावाकडे नेऊन नगर-औरंगाबाद महामार्गाजवळील एका लॉजवर जबरदस्तीने नेले. सुटण्याचा प्रयत्न करूनही आरोपीने तिला रोखून पार्श्वीय लैंगिक अत्याचार केला. सायंकाळी कॉलेज सुटण्याच्या वेळेस आरोपीने तिला कॉलेजच्या मागील गेटजवळ सोडले. त्यानंतर पीडितेने घडलेला प्रकार आईला सांगितला.

# नगरपालिकेत कथित हस्तक्षेपाचा आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी प्रतिनिधी :** संगमनेर नगरपालिकाच्या कारभारात नगराध्यक्षा मैथिली सत्यजित तांबे यांच्या पतीचा कथित हस्तक्षेप होत असल्याचा आरोप शिवसेना-भाजप महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. या प्रकरणी कारवाईची मागणी करत महायुतीच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे.

शासनाच्या धोरणानुसार महिलांना राजकारणात सक्षम सहभाग मिळावा, यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पन्नास टक्के आरक्षण देण्यात आले आहे. महिला पदाधिकाऱ्यांना स्वतंत्रपणे काम करता यावे, यासाठी त्यांच्या पतींना प्रशासकीय कामकाजात हस्तक्षेप करण्यास मनाई करणारा शासन निर्णय लागू आहे. मात्र नगरपालिकेच्या निवडणुकीपासून दैनंदिन कामकाजात सत्यजित तांबे यांचा सातत्याने हस्तक्षेप होत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. ते नगरपालिकेत प्रत्यक्ष उपस्थित राहून अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत बैठका घेत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या



कारभारात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून नगराध्यक्षपद रद्द करण्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयकडे पाठवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपालिका व नगरपंचायत अधिनियम १९६५ च्या कलम ४४ नुसार, कायद्याविरुद्ध कृती आढळल्यास मुख्याधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्याचा अधिकार आहे.

या प्रकरणात राजकीय दबावामुळे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही तर मुख्याधिकाऱ्यांविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येईल, असा इशारा शिवसेना महायुतीच्या नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, शिवसेना शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे, अजित जाधव, विशाल एंगंदुल, शशांक नामन, अक्षय वर्पे, सिद्धार्थ तुरकने आणि अनिकेत चांगले यांनी दिला आहे.

# जेसीबी चालकाच्या हलगर्जीपणामुळे नागरिक पाण्यापासून वंचित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** श्रीरामपूर शहरात अनेक ठिकाणी गॅस पुरवठा पाईपलाईन इत्यादी कामासाठी जेसीबी मशीन डरे सर्वत्र नगरपालिकेच्या खर्चातून उभारलेले डांबरी व सिमेंटचे रस्ते मोडून तोडून टाकून गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी रस्ते खोदण्यात आले आहे.रस्ते होताना टेलिफोनच्या लाईन आहे पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन आहे त्याला धक्का लागू नये म्हणून पुढे अंतर ठेवून रस्त्याच्या मध्यापर्यंत खोदाई सुरु असल्याने त्या रस्त्याने दुचाकी व चारचाकी वाहने सध्या जाऊ शकत नाही.व बराच वेळ सदर रस्त्याने वाहतूक पण करता येत नाही वास्तविक खोदाई झाल्यावर तातडीने पाईप लाईन टाकून रस्ता पूर्ववत होणे गरजेचे असते परंतु हे काम करत असताना जेसीबी चालकाने मालकाने या ठिकाणी कोणातेही नुकसान होऊ नये याची दक्षता घ्यायला पाहिजे पण तसे होत नाही.त्या ठिकाणी नगरपालिकेचे वार्ड कर्मचारी यांनी लक्ष देणे



पण गरजेचे आहे तेथे कोणीही नसल्याने दिनांक १३ फेब्रुवारी रोजी आशीर्वादनगर भागात पाईपलाईन टाकण्यासाठी खोदकाम सुरू असताना श्रीरामपूर नगरपालिकेची आशीर्वादनगर भागात पिण्याचे पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी जेसीबी चालकाच्या हलगर्जीपणामुळे फुटल्यामुळे या भागात नागरिकांना पिण्याच्या पाणीपुरवठा वेळेत पिण्याचे पाणी मिळालेच नाही.यापूर्वी पाणी कमी मिळत असल्याने पाणीपुरवठा अधिकारी निलेश बकाल यांनी या भागात चार इंची पाईप लाईन टाकून पाणीपुरवठा सुरळीत केला होता व आज रोजी सकाळी पाणी न मिळाल्यामुळे सलग दोन दिवस पाण्यावाचून वंचित राहण्याची पाळी आली आहे. तातडीने पाईपलाईन दुरुस्त करण्यात येईल असे अधिकारी निलेश बकाल यांनी सांगितले.व यापुढे त्या भागातील नागरिकांनी खोदाई वेळी जेसीबी चालकाला पाईपलाईन कोठे आहे ते सांगावे म्हणजे अशी वेळ दुसरीकडे येणार नाही.

# पुणे जिल्हा संघाचा उपांत्यपुर्व फेरीत प्रवेश

महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा अजिंक्यपद सब-ज्युनिअर गटाची फुटबॉल स्पर्धा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (डब्ल्युआयएफए) यांच्यावतीने आयोजित महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा अजिंक्यपद सब-ज्युनिअर गटाच्या फुटबॉल स्पर्धेत पुणे जिल्हा संघाने रायगड जिल्हा संघाचा २-० असा सहज पराभव करून उपांत्यपुर्व फेरी गाठली.नांदेड येथील लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय, धरमदाबाद येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत पुणे जिल्हा संघाने संपूर्ण सामन्यावर वर्चस्व गाजवताना पहिल्या १५ मिनिटांमध्येच दोन गोल नोंदवून आघाडी मिळवली. सहाव्या मिनिटाला हितांश खत्री याने गोल करून पुणे संघाने खाते उघडले. त्यानंतर १८ यार्डावरून हितांश याने मारलेला गोल अचूक ठरला. त्यानंतर जोहान जोसेफ याने 'लॉंग शॉट' मारत चेंडू सरळ गोलामध्ये धडवला आणि पुणे संघाला २-० अशी महत्वपूर्ण आघाडी मिळवून दिली. उत्तरार्धात दोन्ही संघाला गोल करण्यात अपयश आले. पूर्णवेळ ही आघाडी कायम ठेवून पुणे संघाने पुढील फेरी गाठली.या स्पर्धेत अहमदनगर, उस्मानाबाद, कोल्हापुर, वर्धा, भंडारा, बुलढाणा, अकोला, परभणी, अमरावती, नांदेड, रायगड, बीड, नंदुरबार, सोलापुर, नाशिक, सांगली, जालना, नागपुर, गोंदीया, लातुर, चंद्रपुर, रत्नागिरी, धुळे, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील संघ सहभागी झाले आहेत.



> स्पर्धेचा सविस्तर निकालः उप-उपांत्यपुर्व फेरीःपुणे जिल्हा संघः २ (हितांश खत्री ६ मि., जोहान जोसेफ १४ मि.) वि.वि. रायगड जिल्हा संघः ०;

# लोणीच्या तीन विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड







**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोणी येथील बी. फार्मसी अंतिम वर्षातील तीन विद्यार्थ्यांनी नामांकित मॅकलॉड्स फार्मास्युटिकल्स

प्रा.ली., दमण या आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध औषधनिर्माण कंपनीत निवड झाली अशी माहिती प्राचार्य डॉ. रविंद्र जाधव यांनी दिली.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण, आधुनिक प्रयोगशाळा सुविधा, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि प्रभावी प्लेसमेंट संधी दिल्या जातात. याच सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना हे यश मिळाल्याचे प्राचार्यांनी सांगितले. कंपनीच्या निवड प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी दाखवलेली उत्तम शैक्षणिक तयारी, तांत्रिक ज्ञान, आत्मविश्वास आणि संवादकौशल्य यामुळे त्यांची निवड निश्चित झाली.

निवड झालेल्या विद्यार्थीमध्ये वैभव लोखंडे, सुशांत दुधवडे आणि प्रतीक खोसे यांचा समावेश आहे.

# विजया एकादशी निमित्त भाविकांनी घेतले माऊलींच्या ''पैस'' खांबाचे दर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :**माघ वद्य विजया एकादशीच्या निमित्ताने नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरामध्ये हजारो भाविकांनी माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या ''पैस'' खांबाचे दर्शन घेतले.यावेळी शेकडो दिंड्यांनी येथे ''ज्ञानोबा माऊली तुकाराम'' असा गजर करत हजेरी लावली होती.आलेल्या दिंडयांचे संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी स्वागत केले.माऊलींच्या माघ वद्य विजया एकादशीच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत नेवासा येथील संतसेवक सखाराम जामदार गुरुजी त्यांचे चिरंजीव गणेश जामदार,





स्वाती जामदार, अ‍ॅड. महेश जामदार, गौरी जामदार यांच्या हस्ते माऊलीच्या पैस खांबास सपत्नीक अभिषेक घालण्यात आला. यावेळी संतसेवक आदिनाथ महाराज पांगरे, दामोदर पवार, शिवाजी अप्पा होन, रविंद्र जमधडे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.विजया एकादशीला दूरवरून दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे संत ज्ञानेश्वर महाराज ''पैस''खांब मंदिराच्या विश्वस्त मंडळींनी स्वागत केले.यावेळी खेड्यापाडयातून पायी आलेल्या व दिंडीतील चालकांचा संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख मार्गदर्शक वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के,देवस्थानचे अध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग, विश्वस्त रामभाऊ जगताप, कृष्णा पिसोटे, कैलास जाधव यांच्या हस्ते श्रीफळ प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रस्तापूर येथील भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम झाला तर रस्तापूर येथील सेवेकऱ्यांनी मंदिरात सेवा दिली. माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, शेतकरी नेते अंबादास कोरडे, नेवासा नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले व डॉ. वैशाली घुले यांनी माऊलींच्या पैस खांबाचे दर्शन घेतले त्यांचा यावेळी देवस्थानच्या वतीने सन्मान करण्यात आला.

# बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती आवश्यक : न्या. शिंदे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरीः** बालविवाह रोखण्यासाठी मुला-मुलींना शिक्षणाची सोय, ये-जा करण्याची सुविधा आणि गावागावात शिक्षण पोहोचणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन राहुरीचे न्यायाधीश आदित्य शिंदे यांनी केले जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अहिल्यानगर व राहुरी तालुका विधी सेवा समिती यांच्या वतीने बालविवाह मुक्त भारत अभियान अंतर्गत १०० दिवसीय विशेष मोहिमेनिमित्त राहुरी येथील कैलासवासी लालाशेठ बिहाणी विद्या मंदिर प्रशाला येथे आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते यावेळी मार्गदर्शन करताना न्यायाधीश शिंदे म्हणाले की, बालविवाह प्रतिबंधक कायदा



२००६ नुसार मुलींचे किमान वय १८ वर्षे व मुलांचे २१ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. बालविवाहामध्ये केवळ पालकच नव्हे तर मंडप व्यावसायिक, केटरर्स, डेकोरेटर व प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणारे सर्वजण दोषी ठरतात. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते. लवकर लग्न झाल्यास मुलींच्या आरोग्यावर, शिक्षणावर व करिअरवर परिणाम होतो. अपुरी शारीरिक वाढ, पोषणाचा अभाव व मानसिक तयारी नसताना संसाराची जबाबदारी टाकली जाते, त्यामुळे भवितव्य धोक्यात येते. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, स्वतःवर विश्वास ठेवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी अ‍ॅड. कल्याणी पागिरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शिक्षण हा आयुष्याचा दागिना आहे. लवकर लग्नामुळे स्वप्ने अधुरी राहतात. बालविवाह हा अदखलपात्र गुन्हा असून त्यात सहभागी सर्वांवर गुन्हा दाखल होऊ शकतो. समाजाने या विरोधात एकत्र येऊन लढा द्यावा. बालविवाहाची माहिती मिळाल्यास ग्रामसेवक, तलाठी, अंगणवाडी सेविका, शिक्षक, पोलीस स्टेशन किंवा हेल्पलाईन १०९८ वर कळवावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक कैलास अनाप यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन धनंजय गिरी यांनी केले. कार्यक्रमास अ‍ॅड. राहुल शेटे, अमोल डौले, अ‍ॅड. सुरेखा कुलकर्णी, अ‍ॅड. वैभव डोंगरे, अ‍ॅड. राहुल दिवे, अ‍ॅड. अनिता तोडमल, शिक्षण विस्तार अधिकारी इंदुमती सोनवणे आदी उपस्थित होते. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा अभियानात अंतरवाली शाळा तालुक्यात प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा :** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा ३ सन २०२५ २६ चे नुकतेच जिल्हास्तरीय परीक्षण पार पडले. नेवासा तालुक्यामध्ये जिल्हा परिषद व्यवस्थापन अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंतरवाली या शाळेने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. या अभियानानुसार अंतरवली शाळेला सन्मानचिन्ह ट्रॉफी व तीन लाख रुपये रोख असे बक्षीस जाहीर झाले आहे. नुकताच या कार्यक्रमाचे आयोजन पंचायत समिती नेवासाच्या सभागृहात माननीय गटविकास अधिकारी श्री संजय लखवाल यांच्या अध्यक्षतेखाली, नगर पालिका मुख्याधिकारी फराटे साहेब,गटशिक्षणाधिकारी श्री



संजय कळमकर,विस्तार अधिकारी श्रीमती शेख रुकसाना मॅडम, केंद्रप्रमुख श्रीमती कमल लाटे श्री संजय शेळके श्री रवींद्र कडू पाटील श्री बाळासाहेब काशीद यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या अभियानामध्ये शाळेच्या अंतरंग व बाह्यांगा बरोबरच विद्यार्थ्यांची गुणवत्ता व इतर भौतिक सुविधांचे परीक्षण करून गुणदान केले जाते. अंतरवाली शाळेमध्ये भौतिक सुविधा तसेच विद्यार्थी गुणवत्ता यामध्ये प्रचंड प्रगती झाल्याचे दिसून आले. या कार्यक्रमाच्या बक्षीस वितरण प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री रविंद्र पागिरे तसेच शाळेतील इतर शिक्षिका श्रीमती लतिका कोलते व तेजश्री निमसे त्याचप्रमाणे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आनंद वाबळे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष राम वाबळे व अंतरवालीचे सरपंच संदीप देशमुख हे उपस्थित होते.आपल्या मनोगतामध्ये मुख्याध्यापक पागिरे यांनी असे सांगितले की शाळेच्या झालेल्या या कायापालटासाठी शाळेतील सर्व ग्रामस्थ सर्व समित्यांचे पदाधिकारी यांची आर्थिक मदत महत्त्वाची ठरलेली आहे. तसेच अतिशय काटेकोरपणे याचे परीक्षण होत असल्यामुळे शाळेमध्ये प्रचंड तयारी व मेहनत शिक्षक वर्गाला घ्यावी लागली. पर्यवेक्षीय यंत्रणेचे कमालीचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल अंतर्वली शाळेतील सर्व शिक्षक वर्गाचे सर्व ग्रामस्थांकडून विशेष कौतुक करण्यात येत आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# बांधकाम कामगारांनी एजंटांना बळी पडू नका : आ. खताळ

## आमदार खताळ यांच्या हस्ते दोन हजार बांधकाम कामगारांना भांडी वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यात महायुती सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा बांधकाम कामगारांना लाभ देण्यात येत आहे. ही सर्व प्रक्रिया विनामूल्य राबविण्यात येत असून बांधकाम कामगारांनी कोणत्याही एजंटांना पैसे न देता थेट महायुती जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधून अर्ज भरून लाभ घ्यावा, असे आवाहन संगमनेरचे आमदार अमोल खताळ पाटील यांनी केले. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वाटप करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून विविध योजनांचे फॉर्म भरण्यासाठी काही ठिकाणी एजंटांकडून पैसे घेतले जात असून फसवणूक केल्याच्या तक्रारी येत आहेत. अशा प्रकारांना बळी न पडता नागरिकांनी आमदार अमोल खताळ पाटील जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधून एक रुपयाही न देता योजनांचे अर्ज भरावेत, असे त्यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. कोणी पैसे मागत असल्यास किंवा अडवणूक करत असल्यास गुप्तपणे माहिती द्यावी संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशाराही यावेळी आ. खताळ यांनी दिला. केंद्र आणि राज्यात महायुतीचे सरकार असून संगमनेरात शिवसेनेचा आमदार असल्यामुळे विकासकामांमध्ये कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असे सांगत आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये महायुती सरकारच्या पाठीशी भक्कम उभे राहण्याचे आवाहन आमदार खताळ यांनी उपस्थितांना केले.




### ६१४४ लाभार्थ्यांना अर्थसहाय्य लाभाचे वाटप

शैक्षणिक योजनेतून ५८४१ लाभार्थींना ५ कोटी ७२ लाख २७ हजार रुपये आरोग्य योजनेत १९ लाभार्थींना ६ लाख ७२ हजार रुपये,

सामाजिक योजनेत १२४ प्रकरणांमध्ये २९ लाख २५ हजार रुपये अर्थसहाय्य योजनेत ६० लाभार्थींना ३० लाख ३२ हजार रुपये

तसेच महायुती सरकाराच्या माध्यमातून लोककल्याणकारी योजनांचा लाभ देऊन सशक्त समाज निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील प्रयत्नशील असल्याचा विश्वास आ. खताळ यांनी यावेळी व्यक्त केला. दोन हजार बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच देण्यात आले. तसेच यापुर्वी एकूण तेरा हजार बांधकाम कामगारांना बांधकाम कामगार कल्याणकारी योजनेअंतर्गत संगमनेर तालुक्यातील ६१४४लाभाचे प्रस्ताव अर्ज मंजूर करून ६ कोटी ३५ लाख ४ हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले असल्याचे आ. अमोल खताळ यांनी सांगितले.

बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वाटप कार्यक्रमाला व्यासपीठावर बांधकाम अधिकारी सौरभ हामंद, उदय सूर्यवंशी, प्रकाश भोसलेशेतकरी नेते संतोष रोहम, ज्येष्ठ नेते वसंतराव देशमुख, शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठलराव घोरपडे, तालुका प्रमुख रामभाऊ राहाणे, राजेंद्र सोनवणे, शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी भाजप तालुका अध्यक्ष गुलाब भोसले, गोकुळ दिघे, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे नगरसेविका, साक्षी सूर्यवंशी, निमोण सरपंच संदीप देशमुख, पायल ताजने, तालुका अध्यक्ष कविता पाटील, संगीता पुंड, सपना जाधव, दिपाली वाव्हळ, अश्विनी कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते.

दखल

## वडाळा महादेव येथे महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रम



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील स्वयंभू पुरातन जागृत देवस्थान श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर महादेव मंदिर या ठिकाणी सालाबादप्रमाणे महाशिवरात्री उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे स्वामी समर्थ सेवेकरी तसेच आरती मंडळ यांच्याकडून जलाभिषेक महाआरती तसेच भाविकांसाठी खिचडी प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी भाविकांनी दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाशिवरात्री उत्सव समिती आरती मंडळ स्वामी समर्थ सेवेकरी ग्रामस्थ वडाळा महादेव यांचेकडून करण्यात आले आहे.

## संजीवनी युनिव्हर्सिटीला टेडएक्सचे सभासदत्व

**कोपरगाव** : गुणवत्तेच्या बळावर संजीवनी युनिव्हर्सिटीने ढएऊ या जागतिक व्यासपीठाचे सभासदत्व मिळवले आहे. या निमित्ताने डरपक्षळींरपळ णपळींशीळीूं येथे जागतिक कीर्तीच्या वक्त्यांच्या प्रेरणादायी व्याख्यानांचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. न्यूयॉर्क मुख्यालय असलेल्या ढएऊच्या सहकार्याने ग्रामीण महाराष्ट्रात प्रथमच असा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास डरपक्षळींरपळ त्रींि ष खपींळींींशीचे अध्यक्ष नितीन कोल्हे, प्रेसिडेंट अमित कोल्हे, कुलगुरू डॉ. ए. जी. ठाकूर यांच्यासह प्राध्यापकवर्ग उपस्थित होता. डॉ. आकाश खुराणा यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेतील मानवी सर्जनशीलतेची भूमिका स्पष्ट केली. डॉ. ऋषिंद्र सिन्हा यांनी आवडीतून करिअर घडवण्याचे महत्त्व मांडले. संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजचे माजी विद्यार्थी व ढशलह चरहळपवीरचे चीफ इनोव्हेशन ऑफिसर डॉ. निखिल मल्होत्रा यांनी एआय सर्जनशील भागीदार कसा ठरतो, हे सांगितले. रवि गुलाटी, डॉ. भरत केळकर, राजिता सिंग, सुमा उईके यांच्यासह बाल लेखिका आद्या काळे व संशोधक सौल पाटील यांनीही अनुभव कथन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुधांशु भट यांनी केले.

## माका महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान उत्साहात



**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील माका येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सौ.शोभाताई एकनाथराव भुजबळ यांनी विद्यार्थीनींना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भानुदास चोपडे यांनी अध्यक्ष स्थान भूषवून विद्यार्थिनींनी निर्भय, निडर आणि निर्भीड व्हावे असे आवाहन केले. महाविद्यालयाची विद्यार्थिनी सानिया शेख हिने सूत्रसंचालन केले, तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अजित हरिश्चंद्रे यांनी केले. प्राध्यापिका मोनाली गायके यांनी अध्यक्षीय सूचना मांडली तर अध्यक्ष सूचनेस प्रा. शहाबाज सय्यद यांनी अनुमोदन दिले. व पाहुण्यांचा परिचय प्रा. दत्ता कोकाटे यांनी केला. प्रा. डॉ. अमोल दहातोंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी , प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर सेवक उपस्थित होते.

## यश मिळवण्यासाठी कष्टाची तयारी ठेवा : न्या. कसबे



**श्रीरामपूर** : जीवनात यश मिळवायचे असेल तर कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. यश हे सहजासहजी मिळत नाही, त्यासाठी परिश्रमांची जोड आवश्यक असते असे प्रतिपादन सत्र व दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश व्ही. एस. कसबे यांनी केले. महाराष्ट्र सेवा मंडळ संचलित शं. स. डावखर कन्या विद्यालयात दहावीच्या विद्यार्थिनींच्या निरोप समारंभ कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीस शुभेच्छा देतानाच, समाजात वावरताना कोणती काळजी घ्यावी आणि स्वत:चे रक्षण कसे करावे याविषयी बहुमोल मार्गदर्शन केले.कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मंडळाचे जेष्ठ विश्वस्त नारायणराव डावखर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. मुमताज शेख यांनी विद्यार्थिनींना 'पोक्सो' कायद्यांतर्गत असलेल्या विविध तरतुदींची सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री औटी यांनी अत्यंत ओघवत्या शैलीत केले, तर उपस्थितांचे आभार जेष्ठ शिक्षक म्हसूजी गांगुर्डे यांनी मानले.

## प्रवरेच्या तंत्रनिकेतनमध्ये ऊर्जा शाश्वतेसाठी तंत्रज्ञान कार्यशाळा




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : पर्यावरणाचा आणि नैसर्गिक ऊर्जेचे संवर्धन करू या.. हा संदेश देत लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजीनियरिंग तंत्रनिकेतन लोणी आणि एआयसीईटी वाणी प्रकल्प अंतर्गत पर्यावरण आणि ऊर्जा शाश्वतेसाठी नवीन तंत्रज्ञान या विषयावरती मराठी भाषेत तीन दिवसीय चर्चासत्र पार पडले अशी माहिती प्राचार्य डॉ. व्ही. आर. राठी यांनी दिली. पर्यावरण आणि पारंपारिक ऊर्जा स्रोत या माध्यमातून आपण निसर्गाचे संवर्धन करू शकतो.

या दृष्टीने ही परिषद महत्त्वपूर्ण अशीच ठरणार आहे, या तीन दिवसीय परिषदेमध्ये मध्ये विविध १२ तज्ञांनी आपले मनोगत व्यक्त करत असतानाच पर्यावरण आणि ऊर्जा शाश्वतेसाठी नवीन तंत्रज्ञान आणि ह्या तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर आणि या माध्यमातून आपली भूमिका विशद केली.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, प्राचार्य डॉ. व्ही. आर. राठी प्रा. एन. एम. गरड, सहसंयोजक प्रा. पी. आर. गुळवे डॉ. विविधा लांडगे, प्रा.ए. एस. दिघे, प्रा. के एस शिरसाठ प्रा. पी. एस. काळे, प्रा. ए. जी खर्डे, जे. बी. कातोरे, एस. डी. खर्डे आदींसह विविध तज्ञ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## तक्षशिला बनली जिल्ह्यातील पहिली 'एआय-रेडी स्कूल; प्रमाणपत्र प्रदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**बालाजी देडगाव** : तंत्रज्ञानाच्या युगात पाऊल टाकत, तक्षशिला इंग्लिश मीडियम स्कूलने शैक्षणिक क्षेत्रात एक मोठी झेप घेतली आहे. शाळेने 'एआय क्लासरूम फाउंडेशन कोर्स' यशस्वीरीत्या राबवल्याबद्दल 'जिओ पीसी' कंपनीने शाळेला अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिली 'एआय-रेडी स्कूल' म्हणून घोषित केले आहे. मनेजर राजीव झा व डेप्युटी मनेजयर अविनाष यांनीजिओ कंपनीच्या वतिने तसे प्रमाणपत्र देऊन विद्यालयाचा गौरव केला. कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाचे महत्त्व ओळखून, शाळेने विद्यार्थ्यांना भविष्यातील तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सज्ज करण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे.

असे संस्थेचे अध्यक्ष प्रा. डा. विजय कदम यांनी या वेळी सांगितले. या अभिनव उपक्रमामुळे शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशामागे मन्वंतर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. विजय कदम आणि संचालिका शुभांगी कदम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे प्राचार्य विठ्ठल कदम, उपप्राचार्य मयूरी पवार, उपप्राचार्य संदीप खाटीक , समन्वय कल्पना पवार यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. या कोर्सच्या यशस्वी आयोजनासाठी आयटी शिक्षक अलफिया शेख व सुनील मुंगसे, तसेच समन्वयक कल्पना पवार यांनी विशेष परिश्रम घेतले. आमच्या विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे हे आमचे ध्येय आहे.

'एआय-रेडी स्कूल'चा दर्जा मिळणे ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे, अशी भावना यावेळी प्राचार्य विठ्ठल कदम यांनी व्यक्त केली. या यशामुळे विद्यार्थ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण असून, पालकांनी शाळेच्या या आधुनिक दृष्टिकोनाचे स्वागत केले आहे.

## मोबाईल बंद ठेऊन वाचनासाठी वेळ द्या : रुकसाना शेख

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : कुसुमाग्रज वाचन अभियानाच्या निमित्ताने नेवासा खुर्द येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये बाल वाचनालय सुरू करण्यात आले.यामध्ये हजारो पुस्तके आधीच उपलब्ध करण्यात आली होती. वाचनाविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती यानिमित्ताने करण्यात आली. सायंकाळी ७ ते ८ यावेळेत मोबाईल बंद ठेऊन वाचनासाठी वेळ द्या असे आवाहन शिक्षण विस्तार अधिकारी रुकसाना शेख यांनी विद्यार्थ्यांना केले.



यावेळी झालेल्या कुसुमाग्रज वाचन अभियानाच्या निमित्ताने बाल वाचनालय सुरू करण्यात आले.या वाचनालयाचे उदघाटन शिक्षण विस्तारअधिकारी रुकसाना शेख यांच्या हस्ते करण्यात आले.शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य पत्रकार सुधीर चव्हाण, उद्योजक स्वप्नील मगर, पालक गोविंद व्यवहारे,इंजिनियर धनश्री काशीद प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख बाळासाहेब काशीद हे होते. यावेळी मुख्याध्यापक असिफ शेख सर यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी आनंद भंडारे व जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या अभियानात मुलांचे मोबाईल स्क्रीन टाईम कमी करणे वाचन व संवाद कौशल्य वाढवणे, अभ्यासाची गोडी लावून व्यक्तिमत्व विकास करणे असे हेतु साध्य करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलतांना शिक्षण विस्तार अधिकारी रुकसाना शेख म्हणाल्या की वाचनामुळे निर्णय घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल,त्यांच्या शैक्षणिक कार्यात नेहमी प्रेरणा मिळत राहील,वाचनातूनच आदर्श नागरिक तयार होतील,विद्यार्थ्यांना उंचीवर घेऊन जाण्याचे मोठे काम वाचनामुळे होईल असे सांगून त्यांनी या अभियानाच्या नुसार सायंकाळी ७ ते ८ मोबाईल बंद ठेऊन वाचण्यासाठी वेळ द्या असे आवाहन केले. यावेळी शालेय व्यवस्थापण समितीचे सदस्य सुधीर चव्हाण, केंद्रप्रमुख बाळासाहेब काशीद यांनी मनोगताद्वारे आपल्या उज्वल भवितव्यासाठी वाचन अभियानाला चळवळ बनवा असे आवाहन केले.या प्रसंगी उपस्थित पालकांनी प्रत्येकी पाच पुस्तके वाचनालयाला भेट देऊन या अभियानाला प्रतिसाद दिला. यावेळी शिक्षिका सुनीता कर्जुले-राऊत, शिक्षक साईनाथ वडते,आण्णासाहेब शिंदे,कामिनी बायस, संध्या लोंढे-नांगरे,विद्या खामकर, ज्योती गाडेकर, मिनाक्षी लोळगे, अर्चना बोकारे, अश्विनी मोरे,प्रतिभा गाडेकर, पालक सुधाकर पडूंरे उपस्थित होते. शिक्षक अण्णासाहेब शिंदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर आदर्श शिक्षिका सुनीता कर्जुले- राऊत यांनी उपस्थित मान्यवर व पालकांचे आभार मानले.

## विकासाचा वेग वाढवत दर्जा टिकवण्यावर भर : पराग संधान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या डॉक्टर जवेरी हॉस्पिटल ते नरोडे यांच्या घरापर्यंत (इंदिरापथ) या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाची नव्याने सुरुवात करून नगराध्यक्ष पराग संधान यांनी सहकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. ही कामे सुरू करण्यापूर्वी त्या कामांची गुणवत्ता आणि दर्जा टिकून राहण्यासाठी आवश्यक त्या सूचना करून कामे दर्जेदार व्हावी यासाठी भूमिका घेत प्रलंबित रखडलेल्या कामाची गती वाढवली आणि झंजावात सुरू ठेवणार असल्याचे स्पष्ट केले. अनेक दिवसांपासून या रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली होती. खड्डे, धूळ आणि पावसाळ्यात साचणारे पाणी यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या डांबरीकरणाच्या कामाची गुणवत्ता, डांबराची जाडी, पाणी निचऱ्याची व्यवस्था तसेच कामाचा वेग यांची नगराध्यक्ष पराग संधान सखोल पाहणी केली. काम दर्जेदार व टिकाऊ व्हावे, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांच्या पैशातून होणाऱ्या विकासकामांत कोणतीही तडजोड होणार नाही, याची स्पष्ट भूमिका यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, गटनेते प्रसाद आढाव, नगरसेवक रवी कथले, नगरसेविका विजयाताई देवकर, कालू आव्हाड, विनोद राक्षे, संदीप देवकर, मुख्याधिकारी सुहास जगताप, बांधकाम अधिकारी मोटे, निलेश बंब, माहूरकर, माजी नगरसेवक संजय कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देणे काळाची गरज : उद्योजक मंगेश दाते

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : कॅम्पुटर च्या जमान्यामध्ये ग्रामीण भागातील मुलांना स्पर्धेमध्ये टिकायचे असेल तर शाळेची शैक्षणिक गुणवत्ता विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन देणे ही येणाऱ्या काळाची गरज असल्याचे मत युवा उद्योजक मंगेश दाते यांनी व्यक्त केले. नुक्तेच पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथील जि. प. प्राथमिक डिजिटल शाळेला भेट दिली. उद्योजक मंगेश दाते हे पारनेर तालुक्याचे विद्यमान आमदार काशिनाथ दाते यांचे चिरंजीव आहेत. मांडवे खुर्द शाळेला भेट दिली असता तेथील शाळा खोल्याची त्यांनी पाहणी केली अतिशय उत्कृष्ट अशी शाळेची इमारत त्यावर केलेले रंगकाम मुलांना खेळण्यासाठी ग्राउंड डिजिटल बनवलेल्या आकर्षक वस्तू व शाळेचा कॅम्पस पाहून ते भारावून गेले व त्यांनी यावेळी शाळेचे कौतुक करत पुढील काळामध्ये शाळेला जी मदत लागेल ती आम्ही विद्यमान आमदार काशिनाथ दाते सर यांच्या मार्गदर्शनाखाली आपणास देण्याचे आश्वासन देतो.

# साईंच्या चरणी देशातील क्रमांक एकच्या बँड पथकाची सेवा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : शिर्डी परिक्रमेत संजीवनी सैनिकी स्कूलच्या शालेय बँडने साई पालखीस मानवंदना दिली. साईबाबा यांच्या जीवनकाळात सुरू झालेली आणि आजही अखंड श्रद्धेने जपली जाणारी शिर्डी परिक्रमा २०२६ साली भक्तिभावाच्या वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडली. साईबाबा संस्थान शिर्डी, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविकांच्या वतीने दरवर्षी नियमितपणे आयोजित होणाऱ्या या परिक्रमेमध्ये यंदा सुमारे तीन ते साडेतीन लाख भाविकांनी सहभाग नोंदवला.

श्रीरामपूर, कोपरगाव, संगमनेर, वैजापूर, येवला, राहुरी यांसह राज्यभरातून तसेच देश-विदेशातून आलेल्या भाविकांनी पहाटेपासून परिक्रमा पूर्ण केली. सुमारे ५ ते ७ किलोमीटर अंतराची व ५ ते ७ तास चालणारी ही परिक्रमा श्रद्धा, कृतज्ञता व मन:शांतीसाठी केली जाते. परिक्रमेची सुरुवात श्री साईबाबा संस्थान ट्रस्टच्या समाधी मंदिरातून झाली. त्यानंतर द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान व खंडोबा मंदिर या पवित्र स्थळांना पायी प्रदक्षिणा घालण्यात आली. 'साई राम'च्या अखंड नामस्मरणात साईबाबांची पालखी खांद्यावर घेत भाविक भक्तिभावाने चालत होते.




### ग्रामस्थांकडून कौतुक व आशीर्वाद

या वेळी शिर्डीतील अनेक ग्रामस्थांनी संजीवनी सैनिकी स्कूलच्या विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. साईबाबांच्या आशीर्वादाने या विद्यार्थ्यांच्या जीवनात उत्तरोत्तर प्रगती होवो, त्यांना अपेक्षित सर्व यश लाभो, अशा सदिच्छा व्यक्त करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आमचा शालेय बँड राष्ट्रीय स्पर्धेसाठी रवाना होण्याच्या आदल्या दिवशीच साईबाबांच्या आशीर्वादाने शिर्डी परिक्रमेत सहभागी होण्याचे निमंत्रण संस्थानकडून आले होते. तोच आशीर्वाद आमच्यासोबत असल्यामुळे आम्हाला राष्ट्रीय स्तरावर विजय मिळाला. मेहनत, जिद्द, चिकाटी व परिश्रम यांसोबत परमेश्वराचा आशीर्वाद तितकाच महत्त्वाचा असतो. त्या ऋणात राहण्यासाठी आज आम्ही साईबाबांच्या सेवेत उपस्थित राहिलो.

**सुमित कोल्हे, विश्वस्त, संजीवनी शिक्षण संस्था**

संपूर्ण परिक्रमेदरम्यान स्वच्छता व शांततेचे काटेकोर पालन करण्यात आले.

**परिक्रमेचे वैशिष्ट्य** : देशातील क्रमांक एक शालेय बँडची मानवंदना

यंदाच्या परिक्रमेत देशपातळीवर प्रथम क्रमांक पटकावलेल्या संजीवनी सैनिकी स्कूल व ज्युनिअर कॉलेज, कोपरगावच्या शालेय बँड पथकाने साईबाबांच्या पालखीसमोर बँड संचलन सादर करत मानवंदना दिली. शिस्तबद्ध पावले, भक्तिरसात न्हालेली धून आणि देशभक्तीची ऊर्जा यामुळे उपस्थित भाविक व शिर्डीवासीय मंत्रमुग्ध झाले. अध्यात्म आणि शिस्त यांचा सुरेख संगम या संचलनातून अनुभवायला मिळाला.

# पान १ वरुन

## बाजारातून तरुणीचे अपहरण; पोलिसांच्या तत्परतेने दोन तासांत सुटका

सांगत दिशाभूल केली. स्कॉर्पिओच्या मागे एक शिफ्ट कारही मदतीला असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. दबाव वाढताच आरोपींनी शिक्रापूरजवळ तरुणीला गाडीतून खाली उतरवून पळ काढला. अवघ्या दोन तासांत पोलिसांनी तरुणीला सुखरूपपणे आई-वडिलांच्या स्वाधीन केले. या प्रकारानंतर शिरापूरच्या ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. मुलीला जबरदस्तीने पळवून नेणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्या वाहनांची जप्ती करावी, अशी मागणी करीत शनिवारी तिसगाव येथे राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन करण्यात आले. आंदोलनामुळे नगर पाथर्डी रस्त्यावर वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या. पोलिस निरीक्षक विलास पुजारी आणि उपनिरीक्षक संदीप ढाकणे यांनी आरोपींना २४ तासांत अटक करण्याची ग्वाही दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. या आंदोलनात सरपंच नितीन लोमटे, युवानेते कुशल भापसे, उपसरपंच पंकज मगर, चेअरमन भाऊसाहेब बुधवंत, बापूसाहेब कुटे, पोपट लोमटे, सचिन पवार, शरद भाताने, श्रीनिवास बुधवंत, अमोल शिंदे, काकासाहेब लवांडे, शुभम बुधवंत, बाबासाहेब लोमटे, संदीप लोमटे, अशोक लोमटे, नामदेव शिंदे, ज्ञानदेव शिंदे, कल्याण शिंदे, किशोर दारकुंडे, भाऊसाहेब लोमटे, गणेश चोथे, ऋषिकेश शिंदे यांच्यासह शिरापूर, करडवाडी आणि तिसगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भरदिवसा घडलेल्या या धक्कादायक प्रकारामुळे महिलांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

## 'टिपू सुलतान हे शिवाजी महाराजांच्या समकक्ष योद्धे होते'

करतो. अजितदादा आता राहिले नाही शरद पवार आणि अजित पवार हे महाराष्ट्राचे भूमिपुत्र आहेत, त्यांचा पक्ष त्यांच्या विचाराने चालेल का? तटकरे आणी पटेल हा पक्ष चालवणार आहेत हा कळीचा मुद्दा आहे. पटेल यांचा तो मी नव्हेच म्हणण्याचा जुना स्वभाव आहे ते पुन्हा एकदा महाराष्ट्र समोर आलं. अजित दादा हे चांगले प्रशासक होते. त्यामुळे त्यांच्या निधनाची बातमी आल्यानंतर त्यांच्या कार्यालयातील लोकांनी लूट करण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले.
भूम परंड्यात सहा महिन्यानंतर केंद्रीय पथक पाहणीसाठी आले. हे वरातीमागून घोडे आहे आणि आता शेतकऱ्यांना ते वाटाण्याच्या अक्षता लावून निघून जातील. मुनगंटीवारांचा बंगला घेण्याइतपत माझी ऐपत नाही. मात्र, रेडी रेकनरच्या दरात ते जर बोलत असतील तर मी त्यांना कळवेल. १७, १८ फेब्रुवारी रोजी आमची दोन दिवस बैठक आहे. संघटना बांधणीच्या हिशोबाने व पुढील वर्षभरात काँग्रेसने कोणत्या दिशेने वाटचाल करावी यासाठी ही बैठक आहे. संघटनात्मक बाबींची चर्चा आम्ही पक्षाच्या बैठकीत करू. अमेरिकेशी केलेल्या करारामुळे शेतकऱ्यांना कुठलाही फायदा होणार नाही नरेंद्र सरेंडर हे शेतकऱ्यांच्या गळ्यात फास लावल्यावरच शांत बसतील. महाविकास आघाडीत लवकरच संवादाची गरज आहे. भाजपाला विरोध म्हणून लवकरच हा संवाद घडून यायला हवा, अशी अपेक्षा यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केले.

उपमहापौरांच्या दालनातील फोटो हटवला मालेगाव महानगरपालिकेत नवनिर्वाचित महापौर आणि उपमहापौरांनी पदभार स्वीकारताच शहरातील राजकारण तापले आहे. उपमहापौर शान-ए-हिंद निहाल अहमद यांनी आपल्या दालनात टिपू सुलतानचे छायाचित्र लावल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे. प्रकरणाची दखल घेत शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक थेट महानगरपालिकेच्या आयुक्त कार्यालयात दाखल झाले. त्यांनी या छायाचित्राचा निषेध नोंदवत, तत्काळ फोटो काढण्यात यावा अशी मागणी केली. जोपर्यंत हा फोटो काढला जात नाही, तोपर्यंत आमचे निदर्शन सुरू राहील. गरज पडल्यास हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशाराही शिवसेनेच्या नगरसेवकांनी दिला. या पार्श्वभूमीवर वाद टाळण्यासाठी प्रशासनाने उपमहापौरांच्या दालनात लावण्यात आलेला टिपू सुलतान यांचा फोटो अखेर हटवला.

## भारत-पाकिस्तान आज एकमेकांना भिडणार!

प्रयत्नांनंतर अखेर हा तिढा सुटला आणि पाकिस्तानने बहिष्कार मागे घेतला. आता पुन्हा एकदा जागतिक क्रिकेटमधील दोन सर्वात मोठ्या प्रतिस्पर्ध्यांना एकाच मैदानावर भिडताना पाहण्याची सुवर्णसंधी चाहत्यांना मिळणार आहे. भारतात, हा सामना विविध स्टार स्पोर्ट्स चॅनेलवर थेट प्रक्षेपित केला जाईल. हा सामना स्टार स्पोर्ट्स १, स्टार स्पोर्ट्स १ एचडी आणि स्टार स्पोर्ट्स २ सारख्या चॅनेलवर थेट प्रक्षेपित केला जाईल. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हा गट अ सामना रविवार, १५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियममध्ये खेळला जाईल. या सामन्याचा टॉस संध्याकाळी ६:३० वाजता (भारतीय वेळेनुसार) होईल, सामना अर्ध्या तासाने संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल.

## मुलगी पळविल्याची माहिती दिल्याच्या रागातून खून; एकास अटक

घोषित केले. या घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा क्रमांक ८१/२६ अन्वये संबंधित कलमानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यातील वैभव एकनाथ काळे याला अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. घटनेचा तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी करीत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी राहुल तुकाराम काळे (वय २५, रा. फक्राबाद) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, गुरुवारी (दि. १२) सागर एकनाथ काळे, वैभव एकनाथ काळे व तुळसाबाई एकनाथ काळे यांनी त्यांच्या घरी येऊन शिवीगाळ करत आमचा भाऊ ज्ञानेश्वर काळे याने कमल बाळू पिंपळे हिची मुलगी पळवून नेल्याची माहिती तिच्या आईला का सांगितली? असा जाब विचारत जीवे मारण्याची धमकी दिली होती. मात्र वाद तात्पुरता मिटल्याने त्यावेळी तक्रार देण्यात आली नव्हती.

## बेलापूर येथे दर शनिवारी मोफत पशु चिकित्सालय सुविधा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**श्रीरामपूर :** प्रोव्हिमी अनिमल न्युट्रिशन प्रा.लि. व सिजेंटा फौंडेशन इंडीयाच्या संयुक्त विद्यमाने 'पशु आरोग्य मित्र' उपक्रम अंतर्गत आठवड्याच्या दर शनिवारी मोफत फिरते (मोबाईल) पशु चिकित्सालय सुविधा उपलब्ध केली जाणार असल्याची माहिती बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे यांनी दिली.खंडागळे यांनी सांगीतले की,बेलापूर-ऐनतपूर व परिसरातील शेतक-यांना पशु वैद्यकीय सेवेची नितांत आवश्यकता होती.याबाबत पालकमंत्री नाम.राधाकृष्ण विखे पा.यांचेशी सविस्तर चर्चा होवून अशी सुविधा उपलब्ध करणेची मागणी करण्यात आली होती. त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळून तातडीने कार्यवाही करण्यात आली. बेलापूर-ऐनतपूर व परिसरातील पशुपालन शेतकऱ्यासाठी आठवड्यातील दर शनिवारी सकाळी ९ ते दुपारी १ या दरम्यान प्रोव्हिमी अनिमल न्युट्रिशन इंडीया कंपनी व सिजेंटा फौंडेशन इंडीयाच्या संयुक्त विद्यमाने बेलापूर येथील आझाद मैदान येथे मोफत पशु चिकित्सा सेवा उपलब्ध केली जाणार आहे.यात आजारी पशुंवर शासकीय दरात उपचार,रोग प्रतिबंधक लसीकरण,पशु आहाराबाबत मार्गदर्शन ,गोचिड ताप वा सारा रोग नियंत्रण ,तसेच पशु संवर्धन विषयक शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली जाणार आहे. या सुविधेचा बेलापूर-ऐनतपूर व परिसरातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा व यासंदर्भात आपणाशी संपर्क साधावा असे आवाहन अभिषेक खंडागळे यांनी केले आहे.

# आश्वासनांतर टोलनाका कर्मचाऱ्यांचे साखळी उपोषण मागे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**संगमनेर :** तालुक्यातील हिवरगाव पावसा टोल नाका येथे काम करणाऱ्या २२ कर्मचाऱ्यांना अचानक कामावरून कमी केल्यानंतर सुरू झालेल्या साखळी उपोषणाला अखेर यश आले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत कमी करण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच थकीत वेतन अदा करण्याचेही आश्वासन देण्यात आले. गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेले टोल कर्मचाऱ्यांचे साखळी उपोषण आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते नारळपाणी देऊन मागे घेण्यात आले.

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील हिवरगाव पावसा टोल नाक्यावर अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना नव्याने आलेल्या जे.आर. रोडवेज कंपनीचे मालक राजपाल यांनी अचानक कामावरून कमी केले होते. काही कर्मचाऱ्यांच्या पगारात कपातही करण्यात आली होती. या निर्णयाच्या निषेधार्थ संतप्त कर्मचाऱ्यांनी साखळी उपोषण सुरू केले होते.

यानंतर शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीस राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचे प्रोजेक्ट मॅनेजर पी. डी. कदम, टोल प्लाझा कंपनीचे मॅनेजर अनुप शिंदे, शिवसेना तालुका प्रमुख रामभाऊ राहाणे, भाजप तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, शिवसेनेचे श्याम राहाणे, भाजपचे महेश मांडेकर तसेच टोल प्लाझा वेल्फेअर असोसिएशनचे कार्याध्यक्ष विलास राहाणे उपस्थित होते.

आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या चर्चेत कामावरून कमी करण्यात आलेल्या सर्व २२ कर्मचाऱ्यांना तत्काळ पुन्हा कामावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय, सर्व टोल कर्मचाऱ्यांच्या पगारातील कपात रद्द करून पगार पूर्ववत करण्याचे आश्वासन देण्यात आले. गेल्या तीन वर्षांपासून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातील तफावत लक्षात घेऊन प्रीती बिल्डर कंपनीचे मालक पुढील आठवड्यात आल्यानंतर वेतनवाढ व पीएफ संदर्भात चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असेही सांगण्यात आले.

तसेच १४ कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन विधी कन्स्ट्रक्शन कंपनीच्या मालकाशी चर्चा करून पुढील आठवड्यात देण्याबाबत सूचना करण्यात येतील, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, या आंदोलनात हरिभाऊ राहाणे, सोपान दुधवडे, पांडुरंग काळे, रामदास दुधवडे, खंडू काळे, रवींद्र काळे, रवींद्र मेंगाळ, नवनाथ दुधवडे, सागर दुधवडे, सचिन काळे, दीपक दुधवडे, राहुल मधे, विनीत दुधवडे, सुनील काळे, बाळासाहेब काळे, भाऊसाहेब काळे, प्रीतम दुधवडे, अजय केदार, विकास दुधवडे, लक्ष्मण दुधवडे, निलेश मधे, सचिन दुधवडे, अनिल फोडसे यांच्यासह सर्व टोल कर्मचारी सहभागी झाले होते.

### आ. अमोल खताळ ठरले आधारवड

आ. अमोल खताळ यांच्या ठाम आणि संवेदनशील हस्तक्षेपामुळे हिवरगाव पावसा टोल नाक्यावर कामावरून कमी करण्यात आलेल्या २२ कर्मचाऱ्यांना पुन्हा न्याय मिळाला. आठ दिवसांपासून सुरू असलेल्या साखळी उपोषणाची दखल घेत त्यांनी संबंधित कंपनी व अधिकाऱ्यांशी थेट चर्चा करून प्रश्न मार्गी लावला. त्यांच्या प्रयत्नांमुळे सर्व २२ कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचा निर्णय झाला, कुठलीही वेतन कपात करणार नाही,थकीत वेतन देण्याचे आश्वासन मिळाले तसेच वेतनवाढ व पीएफ संदर्भात सकारात्मक तोडगा काढण्याचे ठरले. आ. खताळ यांनी स्वतः उपस्थित राहून नारळपाणी देत उपोषण मागे घ्यायला लावले आणि कामगारांच्या डोळ्यांत दिलासा व विश्वास निर्माण केला.

## कान्हेगाव ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी मंगलताई पावसे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**श्रीरामपूर :** तालुक्यातील कान्हेगाव ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी काँग्रेसच्या मंगलताई दत्तात्रय पावसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

कान्हेगाव ग्रामपंचायतच्या सभागृहात झालेल्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली. सरपंच सुरेखा देवराय अध्यक्षस्थानी होत्या. रोटेशन पध्दतीने ठरल्याप्रमाणे मावळत्या उपसरपंच उज्वला खरात यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी मंगलताई दत्तात्रय पावसे यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पावसे यांची निवड जाहीर केली. या निवडीप्रसंगी काँग्रेसचे विद्यमान ग्रा.प. सदस्य अतुल खरात, सोसायटीचे ज्येष्ठ संचालक मधुकरराव खरात, भाजपाचे महेश खरात, संचालक एकनाथराव खरात, संचालक आण्णासाहेब बाळकृष्ण खरात, संचालक शेखर खरात, लक्ष्मणराव खरात, बाळासाहेब चौधरी, प्रकाश चौधरी, शरदराव खरात, शशिकांत



पावसे, मच्छिंद्र पावसे, अनिल भाऊसाहेब खरात, दिगंबर चंद्रभान चौधरी, ज्ञानदेव पावसे, दत्तात्रय पावसे, राजेंद्र वसंतराव खरात आदी उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सतिष शिंदे यांनी काम पाहीले, त्यांना ग्रा.पं. कर्मचारी पोपट खरात यांनी सहकार्य केले. याप्रसंगी ग्रामपंचायतने आजपर्यंत केलेल्या कामांची माहीती महेश खरात यांनी दिली. तर यापुढील काळात ग्रामपंचायतअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विकास कामांचा आढावा सदस्य अतुल खरात यांनी विषद करत सर्वांचे आभार मानले.

## निधन वार्ता

### चांगदेव निघुते



**आश्वी :** श्री स्वामी समर्थ सेवेकरी सामाजिक कार्यकर्त चांगदेव भिकाजी निघुते (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा पश्चात पत्नी, दोन मुले ,दोन मुली,सुना नातवंड, दोन भाऊ, दोन बहीण असा मोठा परिवार आहे.
सामाजिक कार्यकर्त तुषार निघुते, मंगेश निघुते यांचे वडील होत. तर ठकाजी निघुते, तुळशीराम निघुते यांचे बंधु होत.

## पिसाळलेल्या कुत्र्यांचा विस जणांना चावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**गंगापूर :** शहरात शुक्रवारी सकाळपासून एका पिसाळलेल्या भटक्या कुत्र्याने अक्षरशः हैदोस घालत २० हून अधिक नागरिकांना चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली. शहरातील हद्दीत विविध भागांत ही घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.माहितीनुसार, गुरुवार (१३ फेब्रुवारी) रोजी सकाळी व दुपारी शहरातील रस्त्यांवर फिरत असताना त्या भटक्या कुत्र्याने अचानक हल्ले चढवले. रस्त्यावर चालणारे नागरिक, दुकानदार, लहान मुले व महिलांवरही त्याने झडप घातली. या हल्ल्यात अमृता रोकडे (१२), मनीराम राहठवाड, संभाजी निरपळ, फैसल पठाण, अण्णासाहेब पाटील, राजा ठाकूर, अभिषेक चव्हाण, जमीर शेख, अकबर सय्यद, अलामेश बागवान, श्रीराम मुरलीधर सहाने, जहानाब पठाण, अहमद बासवान, मोहम्मद जव्हरी, अकबर जाकीर सय्यद, अकबर मणियार, कृष्णा अजंल, शितल गायकवाड, बालाप्रसाद साबू, ओम मालपाणी, अकबर कुरेशी, जावेद पठाण, विकास खाजेकर, पृथ्वीराज राजपूत, कैलास मस्के व आनंदराव पांढरे हे जखमी झाले.जखमींना तातडीने येथे दाखल करून अँटी-रेबीज इंजेक्शन देण्यात आले. काहींच्या हात-पाय व मांडीवर खोल जखमा झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, कुत्रा अचानक धावत येऊन लोकांवर तुटून पडत होता. भीतीपोटी काही वेळ दुकाने बंद ठेवावी लागली. या प्रकारामुळे नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनावर संताप व्यक्त करत भटक्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली.या घटनेमुळे संपूर्ण गंगापूर शहरात भीतीचे वातावरण असून प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## चेक न वटल्याप्रकरणी आरोपीस कारावास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**श्रीरामपूर :** चेक न वटल्याप्रकरणी दोषी धरत तालुक्यातील टाकळीभान येथील भैलीमकर शकील वाहेद यास सहा महिन्याची सश्रम कारावासाची. शिक्षा सुनावण्यात आली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी जितेंद्र जाधव यांनी हा निकाल दिला.

श्रीरामपूर येथील यशवंत नागरी सहकारी पतसंस्थेकडून शरद हरिभाऊ परभळे यांनी या प्रकरणात आरोपविरुध्दं खटला दाखल केला होता आरोपीने दिलेला चेक बँकेत सादर केल्यानंतर तो न वटल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर कायदेशीर नोटीस देऊनही आरोपीने रक्कम न भरल्याने न्यायालयात खटला दाखल करण्यात आला. खटल्याची सुनावणी होऊन न्यायालयाने दोन्ही बाजूचे युक्तिवाद व कागदपत्रे तपासणीनंतर आरोपीस दोषी ठरविले. तसेच सहा महिन्याचा सश्रम कारावास तथा चेक रक्कमेच्या दुपटी रक्कम दंड रक्कम नुकसान भरपाई म्हणून आरोपीने फिर्यादीला द्यावी. आरोपीने नुकसान भरपाईचा भरणा न दिल्यास त्यास मुख्य कारावासाच्या व्यतिरिक्त एक महिन्याचा साधा कारावास भोगावा लागेल, अशी शिक्षा सुनावली आहे. फिर्यादीच्यावतीने ॲड. उदय ज्ञानदेव रोडे यांनी कामकाज पाहिले.

## लहुजी सेनेच्या राहाता तालुका युवा अध्यक्षपदी दीपक शेलार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**सोनगाव :** भारतीय लहुजी सेनेच्या राहाता तालुका युवा अध्यक्षपदी हनुमंतगाव येथील दीपक साहेबराव शेलार यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेच्या राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाच्या आदेशानुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. निवडीचे अधिकृत पत्र महाराष्ट्र राज्य संघटक भाऊसाहेब आव्हाड यांच्या वतीने शेलार यांना प्रदान करण्यात आले.

भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब बागुल तसेच राष्ट्रीय सचिव हनीफभाई पठाण यांच्या सूचनेनुसार ही निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले. सामाजिक बांधिलकी, संघटन कौशल्य आणि युवकांमध्ये असलेला प्रभाव लक्षात घेऊन शेलार यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

त्यांच्या निवडीमुळे राहाता तालुक्यातील युवकांना संघटित करण्यास आणि सामाजिक उपक्रमांना चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निवडीप्रसंगी आयोजित कार्यक्रमात राज्य व जिल्हास्तरावरील अनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य सरचिटणीस रामभाऊ पिंगळे, राज्य कार्याध्यक्ष समीर वीर, अहमदनगर जिल्हाध्यक्ष रज्जाक भाई शेख, राज्याध्यक्ष सुरेश अडांगळे, राज्य सचिव संतोष भडकवाड, संगमनेर तालुका अध्यक्ष गणेश भाऊ बळसाने, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते राजूभाऊ साळवे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख रईस भाई शेख, जिल्हा युवा सचिव अजय खैरनार,



दिव्यांग आहिल्यानगर जिल्हाध्यक्ष रवींद्र जगधने, संपर्कप्रमुख दगडू साळवे आदी मान्यवरांनी शेलार यांचे अभिनंदन केले.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी युवकांनी संघटनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. लहुजी वस्ताद साळवे यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहितासाठी कार्य करण्याची प्रेरणा या नियुक्तीमुळे मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

नियुक्ती स्विकारताना दीपक शेलार यांनी संघटनेने दाखविलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. राहाता तालुक्यात युवकांना एकत्र आणून शिक्षण, सामाजिक जाणीव आणि संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

## शिवना नदीपात्रात वाळु माफियांच्या दोन गटात हाणामारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**गंगापूर:** तालुक्यातील शंकरपूर व काटे पिंपळगाव परिसरातील शिवना नदीपात्रात गुरुवारी मध्यरात्री अवैध वाळू उपशावरून माजी पंचायत समिती सदस्य व कथित वाळू माफियांचे दोन गट आमनेसामने येत लाठ्याकाठ्यांनी तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी घटनास्थळी उभे असलेले वाळू वाहतुकीसाठी वापरले जाणारे दोन ट्रॅक्टर जप्त करून कारवाई केली आहे. अवैध गौण खनिज उत्खनन व बेकायदेशीर वाहतूक प्रकरणी दोन स्वतंत्र गुन्हे नोंदविण्यात आले असून परिसरात खळबळ उडाली आहे.

पहिली कारवाई पोलीस नाईक शैलेश मनोहर जेजुरकर यांच्या तक्रारीवरून तर दुसरी कारवाई पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण भोजणे यांच्या फिर्यादीवरून केली असून दोन्ही गुन्ह्यात अज्ञात चालक- मालकाविरुद्ध बेकायदेशीर वाळू उत्खनन व वाहतुकीबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

महसुल विभाग अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक होत असताना याकडे दुर्लक्ष होत असल्याने तालुक्यातील शिवना नदीपात्रातून अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक सुरूच असुन अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या विरोधात कारवाई कधी होणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## जमिनीच्या वादातून सासु सुनेला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**राहुरी :** जमीनीच्या वादातून अहिल्यानगर येथील १६ महिला पुरुषांनी राहुरीत येऊन सासू व सुनाला शिवीगाळ करून लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे दि. १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या दरम्यान घडली.

हलीमा कय्युम खान, वय ५५ वर्षे, ह्या राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे राहत असून त्यांचा मुजाहिद बाबुलाल कुरेशी याच्याशी अहिल्यानगर येथील न्यायालयात जमीनी बाबत वाद चालु आहे. तसेच ७/१२ नोंदी बाबत श्रीरामपुर येथील उप विभागीय अधिकारी येथे वाद चालु आहे. दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास हलीमा खान ह्या त्यांच्या घरासमोर असताना तेथे सर्व आरोपी आले. आणि त्यांनी काहीही न बोलता हलीमा खान यांच्या राहते घराला व बाहेरच्या बाजुला बसवलेले सर्व कॅमेरे तोडुन त्याचे नुकसान केले. तसेच हलीमा खान व त्यांच्या सुन आयेशा ह्या दोघींना शिवीगाळ करुन लाथा बुक्क्याने मारहाण केली. आणि सदर जमीन ही आमची आहे, तुम्ही येथुन निघुन जा, नाहीतर तुम्हाला कोयत्याने तोडुन टाकु, अशी धमकी दिली.

घटनेनंतर हलीमा कय्युम खान यांनी राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी मुजाहिद बाबुलाल कुरेशी, झिया ख्वाजा सय्यद, तन्वीर रशीद बागबान, सर्व रा. बेपारी मोहल्ला, जुन्या कलेक्टर ऑफिसच्या पाठीमागे, अहिल्यानगर तसेच एकुण १६ अनोळखी महिलांवर मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

## नशिबाची परिक्षा

रविवार दि . १५ फेब्रुवारी २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १७० २६० ४०० | ८-५ | १४० २३० ६९० | जोड ८१-२५-६९-३८-५४ |

### कल्याण

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | |
|---|---|---|---|
| १२० ६७० १३९ | ३-० | १२७ १९० ११८ | जोड ३१-८०-४२-७५-०२ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १४९ २४८ ४४६ | ४-१ | १२८ २९० २२७ | जोड ४६-८१-०५-७९-१२ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 460 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | | | |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# शेअर गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील आरोपी अखेर अटकेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

अहिल्यानगर : दत्तकृपा ट्रेडिंग या नावाने शेअर बाजारात गुंतवणुकीचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक करणारा आणि जानेवारी २०२५ पासून फरार असलेला आरोपी लक्ष्मण राजू पातकळ याला अखेर पोलिसांनी अटक केली आहे. शेवगाव पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार ही कारवाई करण्यात आली. शेवगाव पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ७१/२०२५ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४०६, ४०९ तसेच महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ अंतर्गत हा गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी दामू ऊर्फ दामोधर लक्ष्मण विघ्ने (वय ६५, रा. मंगरुळ बु., ता. शेवगाव) यांनी



फिर्याद दिली होती.

आरोपी लक्ष्मण राजू पातकळ (वय २७, रा. चापडगाव, ता. शेवगाव) याने दत्तकृपा ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवल्यास शेअर बाजारातून दरमहा ८ ते १० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून फिर्यादी व इतर ठेवीदारांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर सुमारे ५७ लाख ७५ हजार रुपयांची रक्कम स्वीकारून न परत देता स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी

> अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शेवगाव तालुक्यातील नागरिकांना आवाहन केले आहे की, लक्ष्मण राजू पातकळ याने स्थापन केलेल्या दत्तकृपा ट्रेडिंगमध्ये रक्कम ठेवून ज्यांची आर्थिक फसवणूक झाली आहे, अशा गुंतवणूकदारांनी आवश्यक कागदपत्रे व पुराव्यांसह आर्थिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा.

वापर करून तो फरार झाला होता. या प्रकरणी तक्रारदारांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे निवेदन दिले होते. त्यानुसार हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार करत होते. तपासादरम्यान गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी हा वरुड फाटा, चिखलठाणा पोलीस ठाणे हद्दीत, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने तेथे जाऊन आरोपीस ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यास न्यायालयात हजर केले असता २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे. ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

## द•ख•ल

### अहमदनगर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची महिला बचतगटांना अभ्यासभेट




**अहिल्यानगर** : अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर अंतर्गत अर्थशास्त्र विभागाच्या वतीने जिल्हा परिषद अहिल्यानगर आणि उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या सहकार्याने महिला बचतगटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थ व विविध वस्तूंच्या भव्य प्रदर्शन-विक्रीस ऋळशश्रव तळीळीं अंतर्गत विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष अभ्यास भेट आयोजित करण्यात आली. या क्षेत्र अभ्यास भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबनाची भावना निर्माण करणे, उद्योग सुरू करण्याबाबत असलेला न्यूनगंड दूर करणे आणि उद्यमशीलतेकडे सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे हा होता. या भेटीदरम्यान बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी सुप्रभा जाधव व राधा फुलसौंदर यांनी महिला बचतगटांतर्गत तयार केल्या जाणाऱ्या वस्तू, त्यांची निर्मिती प्रक्रिया तसेच यशस्वी वाटचालीच्या कहाण्या प्रत्यक्ष पाहिल्या. विद्यार्थ्यांनी महिला उद्योजकांशी संवाद साधत बचतगट म्हणजे काय, बचतगट स्थापनेचा इतिहास, बचतगट सुरू करताना येणाऱ्या अडचणी, शासकीय मदतीचे स्वरूप आदी विषयांवर सविस्तर माहिती घेतली.

### डोंगरगण शाळेत वाचन संस्कृतीची नवी पहाट

**अहिल्यानगर** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण येथे आज शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद अहिल्यानगर चे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भंडारी यांच्या प्रेरणेतून व शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनातून 'कुसुमाग्रज वाचन अभियानाची उत्साहपूर्ण सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या भव्य ग्रंथदिंडीने झाली. हातात विविध साहित्यिकांच्या ग्रंथांच्या प्रती, तसेच वाचनाचे महत्त्व सांगणारे सुविचारांचे फलक घेऊन विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढली. वाचाल तर वाचाल, मोबाईल कमी, पुस्तक जास्त अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. ग्रंथदिंडीत विद्यार्थ्यांच्या हातात ययाती, विशाखा, नटसम्राट, शेतकऱ्याचे आसूड, फकिरा तसेच भारताच्या संविधानाची प्रतिकृती होती. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ, कुसुमाग्रज आणि अण्णाभाऊ साठे यांच्या वेशभूषेत साकारलेली रूपे विशेष आकर्षण ठरली.

### जातीय द्वेषातून खोटे गुन्हे; डेप्युटी जीएसटी आयुक्तांचा आरोप

**अहिल्यानगर** : आम्ही मागासवर्गीय महार समाजातील असल्यामुळेच आमच्यावर जाणीवपूर्वक जातीय द्वेषातून खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत, असा गंभीर आरोप विवेक प्रभाकर घोडके यांनी पत्रकार परिषदेत केला. ते मुंबई येथे कार्यरत असून सध्या अहिल्यानगर येथे वास्तव्यास आहेत. घोडके यांनी सांगितले की, कादंबरी नगरी-३, इस्कॉन मंदिराजवळील गावडे मळा, पाईपलाईन रोड परिसरात ते पत्नी व दोन मुलींसह मागील १६ वर्षांपासून राहतात. काही वर्षांपूर्वी शेजारी राहायला आलेल्या एका वकील कुटुंबाकडून सातत्याने त्रास दिला जात आहे. महानगरपालिकेची रीतसर परवानगी घेऊन घराचे बांधकाम सुरू असताना अडथळे आणणे, कामगारांना शिवीगाळ व मारहाण करणे, जातीय अपमान करणे असे प्रकार झाल्याचा आरोप त्यांनी केला. दि. ९ ऑक्टोबर २०२४, १२ ऑगस्ट २०२५ व ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी आमच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले. ३१ ऑक्टोबरच्या घटनेत मी घटनास्थळी नसतानाही माझे नाव गंभीर गुन्ह्यात टाकण्यात आले, तसेच सीसीटीव्ही फुटेज आमच्याकडे असल्याचे त्यांनी सांगितले. वकील असल्याचा गैरफायदा घेतला जात असल्याचा आरोप करत त्यांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र-गोवा व नगर कोर्ट बार असोसिएशनकडे तक्रारी केल्याचे नमूद केले. या प्रकरणात न्याय न मिळाल्यास रिपब्लिकन पक्षाकडून आंदोलनाचा इशाराही देण्यात आला.

# विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी पायाभूत सुविधांचा विकास आवश्यक : डॉ. परकाळ



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव** : चालू अर्थसंकल्पात रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरसाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. हा विकासच आधुनिक अर्थव्यवस्थेचा मुख्य पाया आहे.आरोग्य सेवांचे सक्षमीकरण: कोविड महामारीनंतर आरोग्य क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे बळकट करणे,'आयुष्मान भारत' योजनेचा विस्तार आणि वैद्यकीय संशोधनाला गती दिल्यास एका निरोगी समाजाची निर्मिती होईल.कर व्यवस्थेत सुधारणा करून मध्यमवर्गीयांना दिलासा देण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे.कृषी,शिक्षण आणि महिला सबलीकरण शिक्षणाच्या सोयी-सुविधेत अधिक वाढ होणे गरजेचे आहे, तसेच कृषी क्षेत्राला अधिक सवलती मिळणे आवश्यक आहे,भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असून, योग्य धोरणांमुळे विकसित भारताचे स्वप्न लवकरच साकार होईल असे प्रतिपादन डॉ भागवत परकाळ यांनी बोलताना व्यक्त केले.

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे,अहिल्यानगर येथील मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित विशेष व्याख्यानात अहमदनगर कॉलेज,अहिल्यानगर,अर्थशास्त्र विभागाचे प्रा.डॉ.बी.एस. परकाळ यांनी आपले विचार पावर पॉइंट प्रेझेंटेशन पीपीटी च्या साह्याने मार्गदर्शन केले. केंद्रीय अर्थसंकल्प आणि भारताची आर्थिक दिशा या विषयावर बोलताना त्यांनी आधुनिक अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख,प्राध्यापिका ए.एच. लहाडे, या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.के.आर. पिसाळ,प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.डी. जी. गदादे यांनी केला. या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ.एस.बी.दहातोंडे, प्राध्यापिका के.एस.कराड ,प्रा.एस.एस.शिंदे, यांनी विशेष सहकार्य केले.या कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागासह वाणिज्य शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका ए.एच. लहाडे,यांनी केले तर उपस्थिताचे आभार प्राध्यापिका एस.ए.घालमे यांनी मानले.

# 'माझी शाळा सुंदर शाळा' अभियानात नेवासा मुलींची शाळा तालुक्यात तिसरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानांतर्गत झालेल्या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेवासा मुलींच्या शाळेने नेवासा तालुक्यात तृतीय क्रमांक पटकावला. शासनातर्फे मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा या अंतर्गत राबविण्यात आलेल्या शासनाच्या उपक्रमामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेवासा मुली शाळेने सहभाग घेतला होता.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करण्यासोबतच अध्ययन,अध्यापन,प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर,पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सार्वजनिक व वैयतिक स्वच्छता,चांगले आरोग्य, राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न,अंगभूत कला क्रीडा गुणांचा विकास आदी अशा अनेक विविध घटक व उद्दिष्टांवर शाळेने काम केले. तालुक्यातील २५१ शाळांचे मूल्यांकन करून स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला.यामध्ये तृतीय क्रमांक जिल्हा परिषद शाळा नेवासा मुली शाळेने पटकविला.

नेवासा पंचायत समिती येथे आयोजित कार्यक्रमात गटविकास अधिकारी संजय लखवाल, नगरपंचायत मुख्याधिकारी निखिल फराटे, गटशिक्षणाधिकारी संजय कळमकर, घोडेगाव ग्रामपंचायत सरपंच राजेंद्र देसरडा यांच्या हस्ते जिल्हा परिषद शाळा नेवासा मुली शाळेचे मुख्याध्यापक अरविंद घोडके, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा वर्षा पठाडे,उपाध्यक्षा अनिता डोकडे, भावना चव्हाण, शिक्षक शरद मचे, विठ्ठल कांगुणे, प्रतिभा पालकर,सुनीता वणे, ज्योती बोरुडे, वर्षा जगताप,वैशाली कुलट, व्यवस्थापन समितीचे सचिन गव्हाणे, शाम डोकडे, गौरव चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी विस्ताराधिकारी मिरा केदार, रुक्साना शेख, केंद्र प्रमुख संजय शेळके, रवींद्र कडू, बाळासाहेब काशिद, कमल लाटे,विषय शिक्षक सामी शेख उपस्थित होते.

# आ. तनपुरे यांच्याकडून मोफत टँकरची सुविधा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**करंजी** : पाथर्डी तालुक्यातील मिरी येथे तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी मतदारसंघाचे माजी आमदार तथा माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या पुढाकारातून मोफत पिण्याच्या पाण्याच्या टँकरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या माध्यमातून पाण्यापासून वंचित राहिलेल्या नागरिकांना नियमितपणे मोफत पाणीपुरवठा केला जाणार आहे.सदर मोफत टँकर सेवेचे उद्घाटन ह.भ.प. जगन्नाथ महाराज गवळी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी शिवसेना (ठाकरे गट) उपतालुकाप्रमुख भागिनाथ गवळी, बंडू आबा झाडे, विजय गवळी, राजुभाई शेख, बाबासाहेब निर्मळ, अशोक घोंगडे, भागचंद गवळी, बाबुराव जमधडे, वसंत वाघमारे, जालिंदर घोरपडे, मच्छिंद्र घोरपडे



आदींसह ग्रामस्थ व तनपुरे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातील पाणीटंचाईची समस्या कायमस्वरूपी मार्गी लागेपर्यंत ही मोफत टँकर सेवा सुरू ठेवण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ग्रामस्थांना कोणताही त्रास सहन करावा लागू नये, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे तनपुरे समर्थकांकडून सांगण्यात आले.

# कृषि विद्यापीठात शिवारफेरी व कृषि प्रदर्शनाचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, आत्मा, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि उमेद अभियान जिल्हा परिषद अहिल्यानगर, महाबीज, नाबार्ड, पाणी फाउंडेशन आणि इतर सहयोगी संस्थांच्या सहकार्याने दि. १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी कृषि विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसरात फुले कृषि महोत्सव- २०२६ थेट पीक प्रात्यक्षिके, शिवार फेरी व कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे तसेच जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा अहिल्यानगरचे सन्माननीय पालकमंत्री मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित असणार आहे. या फुले कृषि महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय कृषि मंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती ना. दत्तात्रय भरणे यांचे शुभहस्ते होणार आहे. याप्रसंगी वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय कामगार राज्यमंत्री ना.ड. आशिष जयस्वाल व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष तथा सेवा प्रवेश मंडळाचे अध्यक्ष तुषार पवार उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी राज्याचे कृषि आयुक्त सुरज मांढरे उपस्थित राहणार आहेत. यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व लोक प्रतिनीधी, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतुन साकार झालेल्या कृषि तंत्रज्ञान घरो घरी, समृध्दी येईल गावो गावी या उपक्रमांतर्गत फुले कृषि महोत्सव-२०२६ मध्ये विविध पिकांचे १०० एकर क्षेत्रावर पीक प्रात्यक्षिके, कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# जामखेड शहरातील अतिक्रमणधारकांना नोटिसा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या शहरातील टप्प्यातील काम लवकरच सुरू होणार असल्याने रस्त्यालगत असलेली अतिक्रमणे हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जामखेड नगरपरिषदेने अतिक्रमणधारकांना सात दिवसांत स्वतःहून अतिक्रमणे काढण्याच्या नोटिसा बजावल्या असून त्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे. यापूर्वीही अनेकदा नोटिसा देण्यात आल्या होत्या; मात्र प्रत्यक्ष कारवाई न झाल्याने यंदा प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

गेल्या तीन वर्षांपासून जामखेड-सौताडा महामार्गाचे काम सुरू आहे. यातील खर्डा चौक ते बीड रोड हा टप्पा अनेक महिन्यांपासून रखडला होता. नूतन नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, नगरसेवक पांडुरंग भोसले, अवधूत पवार तसेच विविध राजकीय पक्षांनी पाठपुरावा केल्यानंतर कामाला गती मिळाली. मात्र खर्डा चौक, जयहिंद चौक आणि बीड रोड परिसरात मोठ्या प्रमाणावर झालेल्या अतिक्रमणांमुळे रस्त्याच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत.

या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे यांनी अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावल्या आहेत. शहराच्या हद्दीतून जाणारा राष्ट्रीय महामार्ग ५४८डी हा रस्ता विकास योजनेत समाविष्ट असून, रस्त्यालगत कोणतीही पूर्वपरवानगी न घेता केलेले बांधकाम नियमबाह्य ठरते. तसेच नगरपरिषद हद्दीत पाणीपुरवठा योजना व भुयारी गटार योजनेची कामे प्रस्तावित असल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नाल्यांपासून तीन मीटरच्या आत असलेली सर्व बांधकामे अनधिकृत ठरतात. नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांत अतिक्रमणे हटवावीत व यंत्रणेला सहकार्य करावे, अन्यथा संबंधित विकास यंत्रणेमार्फत अतिक्रमणे हटवून त्याचा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल, तसेच होणाऱ्या नुकसानीस अतिक्रमणधारक स्वतः जबाबदार राहतील, असे नोटिसीत स्पष्ट करण्यात आले आहे.

# क्रिकेटमध्ये इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे दणदणीत यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : १३ फेब्रुवारी रोजी अशोक पॉलिटेक्निक, श्रीरामपूर येथे आई.ई.डी. एस.एस.ए.ई. झोन १ अंतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत क्रिकेट या क्रीडाप्रकारात प्रथम क्रमांक पटकावला.अंतिम फेरीत अमृतवाहिनी पॉलिटेक्निक संगमनेर या बलाढ्य संघाला पराभूत करत इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या संघाने आपले वर्चस्व सिद्ध केले.

संघभावना, अचूक रणनीती आणि दमदार खेळाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची मने



जिंकली. क्रिकेट संघात कंप्यूटर विभागातून लोखंडे आदित्य, काकडे पृथ्वीराज, पठारे सुरज, गायकवाड हर्षद, शेख अरमान, भोसले शंभूराज. सिव्हिल विभागातून जाधव प्रवीण, लाटे अक्षय मेकॅनिकल विभागातून शेख साहिल, राजळे ऋतिक, शेलार प्रताप, थोरात ओंकार. इलेक्ट्रॉनिक अँड टेलीकम्युनिकेशन विभागातून लांडे ऋषभ, बेल्हेकर सार्थक, गटने आकाश या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या उल्लेखनीय यशामुळे इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या संघाची पुढे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र शिवाजीराव नागवडे, व्हॉ.चेअरमन मेघाताई संदीप औटी, सर्व संचालक मंडळ, संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड, प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे, क्रीडा शिक्षक मिलिंद शेलार, विभागपमुख हवालदार व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या विजयामुळे संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील परंपरेत आणखी एक सुवर्णपान जोडले गेले आहे.

# अजित दादांच्या जाण्याने राज्य पोरके

## पाथर्डीत स्मारक उभारणार : आ. गर्जे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी** : प्रशासनावर मजबूत पकड, स्वच्छतेची आवड, ठोस निर्णयक्षमता आणि शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांशी निष्ठा राखत सर्वधर्मीयांना सोबत घेऊन विकासाचा ध्यास घेणारे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण राज्याचे मोठे नुकसान झाले असून पाथर्डी तालुका अक्षरशः पोरका झाला आहे, अशी भावना आमदार शिवाजीराव गर्जे यांनी व्यक्त केली. त्यांच्या कार्याची चिरंतन आठवण राहावी व नव्या पिढीला प्रेरणा मिळावी, यासाठी पाथर्डी शहरात भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

येथील गोरे मंगल कार्यालय येथे आयोजित सर्वपक्षीय शोकसभेत ते बोलत होते. व्यासपीठावर माजी आमदार व जिल्हा बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले, माजी सभापती गोकुळ दौंड, ड. अंकुशराव गर्जे, ज्येष्ठ नेते भीमराव फुंदे यांच्यासह विविध पक्षांचे तालुकास्तरीय पदाधिकारी, नगरसेवक, सरपंच व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार गर्जे म्हणाले की, जवळपास पंचवीस वर्षे अजित दादांसोबत काम करण्याची संधी मिळाली. दारात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे काम जाती-पक्षभेद न ठेवता मार्गी लावणे हा त्यांचा




जीवनमंत्र होता.

कडक शिस्त, आर्थिक काटेकोरपणा आणि जनतेच्या प्रश्नांवर तत्काळ निर्णय ही त्यांची ओळख होती. 'लाडकी बहीण' योजनेबाबत निधीअभावी अडचणी येतील, अशा अफवा पसरवल्या गेल्या; मात्र दादांनी निधी कमी पडू दिला नाही. पहाटे जनता दरबारातून कामाला सुरुवात करणे, जिल्हाधिकारी ते तलाठीपर्यंत थेट सूचना देऊन प्रश्न सोडवणे आणि गुन्हेगारीविरोधात शून्य सहिष्णुता राखणे ही त्यांची कार्यपद्धती सर्वश्रुत होती.

सामान्य शेतकरी व ऊस उत्पादकांच्या हितासाठी त्यांनी सातत्याने निर्णय घेतले. माजी आ. चंद्रशेखर घुले यांनीही भावना व्यक्त करताना दुष्काळी काळात 'गाव तेथे छावणी'चा निर्णय घेण्यात दादांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. शोकसभेला सर्वपक्षीय उपस्थिती लाभली असून संपूर्ण परिसर शोकाकुल झाला होता. अजित दादांच्या जाण्याने पाथर्डी तालुक्याने आपला खंबीर आधार गमावल्याची भावना उपस्थितांतून व्यक्त होत होती.

द • ख • ल

## हातचलाखीने एक लाख ४० हजारांच्या सोन्याच्या अंगठ्या लंपास

**शिरूर :** शिरूर शहरात पोलिस असल्याचे भासवून दोन अज्ञात चोरट्यांनी १ लाख ४० हजार रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या अंगठ्या हातचलाखीने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक १२१/२०२६ भा.न्या.सं. कलम ३१६(२), ३(५), २०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.३० ते ३.५५ वाजण्याच्या सुमारास वेदांता हॉस्पिटल शेजारील डायग्नॉस्टिक सेंटर परिसरात, पुणे–नगर महामार्गावरील चहाच्या टपरीजवळ घडली. दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीस आम्ही पोलीस आहोत असे सांगून अंगावरील दागिने काढून रुमालात ठेवण्यास सांगितले. फिर्यादीने विश्वासाने अंदाजे प्रत्येकी ५ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या रुमालात ठेवून घेतल्या. त्यानंतर आरोपींनी हातचलाखी करून त्या अंगठ्या लंपास केल्या.

चोरीस गेलेल्या अंगठ्यांची एकूण किंमत सुमारे १ लाख ४० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार जगताप करीत आहेत. नागरिकांनी अशा प्रकारच्या अनोळखी व्यक्तींवर विश्वास न ठेवता तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## मु. सा. काकडे महाविद्यालयाचा विद्यार्थी अखिल भारतीय स्पर्धेसाठी निवड

**सोमेश्वरनगर :** येथील एम. एस. काकडे महाविद्यालयाचा विद्यार्थी मयुर तानाजी येळे याची १५ रोजी महर्षी दयानंद विद्यापीठ येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तो सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या संघातून सहभाग नोंदवणार आहे.

राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष सतीशराव काकडे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभिजीत काकडे तसेच सचिव सतीश लकडे यांनी त्याचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी त्याला शुभेच्छा देत अखिल भारतीय स्तरावर पदक मिळविण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले. प्रा. दत्तराज जगताप व प्रा. डॉ. बाळासाहेब मरगजे यांचे त्याला मार्गदर्शन लाभले आहे.

## निशिकांत दुबेंचे वक्तव्य 'संविधानीक अज्ञान व बाल-बुध्दी' दर्शवणारे

**विरोधीपक्षनेते राहुल गांधी विषयीचे व्यक्तव्य : काँग्रेस वरीष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी**

**पुणे :** - भाजप खा. निशिकांत दुबे यांनी महाराष्ट्रातील मराठी भाषिक व भूमिपुत्रांच्या विषयी काही दिवसांपूर्वीच वादग्रस्त वक्तव्य केले त्यावर महाराष्ट्रातील रणरागिणींनी त्यांना संसद भवनात घेराव घालून सुनावले देखील होते. मात्र आपल्या बालीश व नाठाळ हरकतीं पासुन न सुधारलेले निशिकांत दुबे यांनी संसदेतील विरोधी पक्ष नेते राहुलजी गांधी यांचे विषयी काढ़लेले ऊदगार, वक्तव्य व कथित प्रस्ताव हा संविधानिक अज्ञान, असुया, द्वेष व बालबुध्दी प्रदर्शीत करणारे असल्याची टिका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरीष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, देशात मोदी सरकारचा २०१४ ते २४ चा कार्यकाळ व प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेऊनच देशातील जनतेने भाजप'ला अपेक्षे प्रमाणे ४०० पार जागा दिल्या नाहीत, तर उलटपक्षी ईडी, सत्ताधारी भाजपा ने सीबीआय, प्राप्तिकर विभाग व निवडणूक आयोग व पक्षफोडी इ तंत्रे यांचे सहाय्य घेऊनही भाजप'च्या संसदेतील सु ३५% जागा कमी झाल्या व मा राहुल गांधी व खर्गेंच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या १०० % जागा वाढून ५२ च्या १०२ जागा झाल्याने, देशातील जनतेनेच् देशाच्या - संसदेत काँग्रेस-इंडीया आघाडीच्या माधमातून, मा राहुल गांधी ना मजबूत विरोधी पक्ष नेता केले आहे, याचे किमान भान बालबुध्दी खासदार निशिकांत दुबे यांनी ठेवावयास हवे होते.

सत्य बाहेर आल्यास सत्ताधाऱ्यांची पोलखोल होईल याचे भान लोकसभा सभापतींना होते, म्हणूनच त्यांनी विरोधी पक्ष नेते राहुल गांधींना पुरावे मांडण्यापासुन रोखले, मात्र मोदी - शहांच्या पुढे चाटुकारिता करणाऱ्या व देशाच्या स्वातंत्र्य संग्रामा'प्रती अनास्था बाळगणाऱ्यांना याचे भान कसे असणार(?) असा मिश्किल व उपहासात्मक सवाल ही त्यांनी उपस्थित केला.

# बारामतीतील सिद्धेश्वर देवस्थानात महाशिवरात्र उत्सवाची जय्यत तयारी

## बारामतीच्या श्री सिद्धेश्वराचा वैभवशाली इतिहास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** – कऱ्हा नदीच्या तीरावर वसलेले बारामती शहर राजकीय घडामोडींसाठी ओळखले जात असले, तरी येथील ऐतिहासिक वारसा तितकाच समृद्ध आहे. शहराचे ग्रामदैवत असलेले सिद्धेश्वर देवस्थान हे मंदिर सुमारे ७८६ वर्षांचा इतिहास जपत आजही भक्तांच्या श्रद्धेचे केंद्रस्थान ठरले आहे.

यादवकालीन हेमाडपंती शैलीत बांधलेले हे मंदिर शिल्पकलेचा अप्रतिम नमुना मानले जाते. इतिहासातील उल्लेखांनुसार इसवी सन ११४७ मध्ये राजा रामदेवराय यादव यांनी मंदिराच्या बांधकामास प्रारंभ केला. सुमारे नव्वद वर्षांच्या कालावधीनंतर सन १२३७ मध्ये बांधकाम पूर्ण झाले. अखंड लिंग आणि अखंड दगडातून कोरलेला देखणा नंदी हे या मंदिराचे वैशिष्ट्य मानले जाते. मंदिराच्या कळसाखाली ध्यानधारणेसाठी विशेष जागा असून, सभामंडपातील कासवाखालील नक्षीकाम भाविकांचे लक्ष वेधून घेते.

''नंदीच्या अंगावर दगडाने कोरलेली झूल....
अखंड दगडात कोरलेले सालंकृत रूप, आरामदायी बैठक, त्यामध्येच चपळ असा नंदी, हे सिद्धेश्वर मंदिराचे वैशिष्ट्य. नंदीच्या अंगावर दगडात कोरलेली झूल आणि घुंगरे आहेत. समोरून नंदीकडे पहिले, तर त्याचा एक कान पाहणाऱ्याकडे आणि दुसरा महादेवांकडे आहे. नंदीचा ओटा हा १२ फूट लांब व १२ फूट रुंद व ओट्याचा जोता हा अडीच फूट उंच आणि तीन कप्प्यांत आहे. नंदीचे मुख्य जोते ४ फूट लांब व ३ फूट रुंद आहे. नंदीची उंची ६ फूट, तर अकरा इंच उंचीचे वशिंड, सव्वा फुट उंचीची शिंगे आणि ११ इंचाचे कान आहेत. नंदीच्या गळ्यात ५ इंचाची घंटी, ५० घुंगरांचा बाजूबंद पट्टा आहे. नंदीची मेघडंबरी १३ लहान दगडी कमानींची असून चार बाजूला हनुमान व नक्षीकाम केलेले खांब आहेत.

सिद्धेश्वर मंदिराला ऐतिहासिक परंपरा आहे. याचे जतन करण्याचा प्रयत्न आम्ही सातत्याने करीत आहोत. यात वारसाप्रेमींची साथ मिळाल्याने हा पुरातन ठेवा आजही सुस्थितीत आहे. कार्तिक स्वामी, दत्त महाराज, हनुमान, विठ्ठल रुक्मिणी, कालभैरवनाथ ,महाकाली,नरसिंह, परशुराम, हनुमान, संतोषीमाता गोंदवलेकर महाराज, संत तुकाराम संत ज्ञानेश्वर आदींची छोटी मंदिरे भाविकांच्या इच्छे खातीर परिसरात बनवली आहे. सिद्धेश्वर मंदिर म्हणजे बारामतीच्या वैभवशाली अध्यात्म च्या इतिहासाचे साक्षीदार होय

**– समीर दाते, मुख्य विश्वस्त, श्री सिद्धेश्वर मंदिर, बारामती**



सिद्धेश्वर मंदिर व समोर च्या बाजूस नंदी व इनसेट मध्ये ग्रामदैवत सिद्धेश्वर

या मंदिराला अनेक संत-महंत व ऐतिहासिक व्यक्तींनी भेट दिल्याची नोंद आहे. त्यामध्ये संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, शहाजीराजे भोसले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज तसेच कविवर्य मोरोपंत यांचा समावेश आहे. संत ज्ञानेश्वरांनी येथे गणपतीची मूर्ती स्थापन केल्याची परंपरा सांगितली जाते. तसेच संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा मुक्काम पूर्वी या मंदिरात होत असे, अशीही माहिती मिळते.

शिवकालानंतर बाजीराव पेशवे यांनी पांडुरंग दाते यांच्याकडे मंदिराची व्यवस्था सोपविल्याचा उल्लेख आहे. तेव्हापासून दाते कुटुंबीयांकडेच मंदिराची देखभाल असून सध्या बारावी पिढी देवसेवा करत आहे. तसेच बाळाजी विश्वनाथ भट यांनी इसवी सन १७२३ मध्ये मोडी लिपीत मंदिरासंदर्भात सनद लिहून दिली होती, जी आजही जतन करण्यात आली आहे.

दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्त मंदिरात भव्य उत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाही महाशिवरात्र उत्सवासाठी जय्यत तयारी सुरू असून विविध कीर्तनकारांना आमंत्रित करण्यात येणार आहे. दर्शनासाठी राज्याच्या विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे. ऐतिहासिक वारसा, उत्कृष्ट स्थापत्यशैली आणि धार्मिक परंपरा यांचा संगम असलेले सिद्धेश्वर देवस्थान बारामतीच्या वैभवशाली परंपरेचे आजही जिवंत प्रतीक आहे.

## स्थानिक वाहनांना आता द्यावा लागणार टोल

### डुंबरवाडी टोलनाका प्रशासनाचा फतवा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** नगर –कल्याण महामार्गावरील डुंबरवाडी येथील टोलनाक्यावर स्थानिक वाहनांना दिली जाणारी सवलत बंद करण्यात आली असून ११ फेब्रुवारीपासून सर्व प्रकारच्या व्यावसायिक वाहनांना टोल भरावा लागणार आहे. टोलनाका व्यवस्थापक योगेश नानकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

खामुंडी परिसरासह आजूबाजूच्या भागातील वाहनांना यापूर्वी स्थानिक म्हणून सवलत देण्यात येत होती. मात्र काही व्यावसायिक वाहनचालक 'लोकल' असल्याचे सांगून टोल न भरता जात असल्याने प्रशासनाचे आर्थिक नुकसान होत असल्याचे व्यवस्थापनाने स्पष्ट केले. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पत्रानुसार नव्या नियमांची

''जुन्नर तालुक्यातील स्थानिक वाहन चालकांना आपले आधारकार्ड दाखविल्यानंतर डुंबरवाडी टोलनाक्यावर सूट दिली जात होती तीच पद्धत योग्य आहे मासिक पास घेणं सर्वांना शक्य होणार नाही अन्यथा तो फ्री दिला पाहिजे ''

**अनिल बोडके स्थानिक ग्रामस्थ**



अंमलबजावणी करण्यात येत असल्याचेही सांगण्यात आले.

कार लाईनमधील वाहनांसाठी दरमहा सुमारे ३५० रुपये शुल्क आकारण्यात येणार असून इतर व्यावसायिक वाहनांसाठी स्वतंत्र दर निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित वाहनचालक व मालकांनी नव्या नियमांची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन टोल प्रशासनाने केले आहे.

## संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर महाद्वार नूतनीकरण कामाचे शिलापूजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी यांच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराच्या महाद्वार नूतनीकरण कामाचा शिलापूजन सोहळा उत्साहात पार पडला. श्री ज्ञानेश्वर विद्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास भाविक, वारकरी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या हस्ते शिलापूजन करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी माधव खांडेकर, आर.के.सी. कंपनीचे शुभम राजकुमार चव्हाण तसेच उपनगराध्यक्ष सुजाताताई तापकीर यांची उपस्थिती होती. मान्यवरांनी महाद्वाराच्या नूतनीकरणामुळे भाविकांना अधिक सुरक्षित, सुबक व सुसज्ज सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला.कार्यक्रमाचे



आयोजन संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विश्वस्त योगी निरंजननाथ गुरु शांतिनाथ, चैतन्य महाराज लोंढे (कबीरबुवा), डॉ. रोहिणीताई पवार तसेच पुरुषोत्तम मुरलीधर पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.यावेळी मनोगत व्यक्त करताना चैतन्य केशवराव लोंढे (कबीरबुवा) म्हणाले की, महाद्वार हे केवळ प्रवेशद्वार नसून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पावन स्थळाची ओळख आहे. राज्यासह देश-विदेशातून येणाऱ्या लाखो भाविकांचे स्वागत याच द्वारातून होते. त्यामुळे महाद्वाराचे नूतनीकरण हे श्रद्धा, परंपरा आणि आधुनिक सुविधांचा सुंदर संगम ठरेल. भाविकांना अधिक सुरक्षित, सुबक आणि शिस्तबद्ध व्यवस्था उपलब्ध करून देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनीही भावना व्यक्त करताना सांगितले की, महाद्वार नूतनीकरणाच्या या कामामुळे श्री क्षेत्र आळंदी देवाची येथील मंदिर परिसर अधिक आकर्षक, सुव्यवस्थित व भाविकांसाठी सोयीस्कर होणार आहे.

# कुंभमेळ्यात महिलाच्या सुरक्षेसाठी सर्वोतोपरी उपाययोजना कराव्यात

## उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात देश – विदेशातून महिला भाविक येतील. या महिला भाविकांच्या संरक्षणासाठी सर्वो तोपरी उपाययोजना कराव्यात, अशा सूचना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी दिल्या.

**नाशिक परिक्षेत्र विशेष पोलिस महानिरीक्षक कार्यालयात बैठक**

नाशिक परिक्षेत्र विशेष पोलिस महानिरीक्षक कार्यालयात डॉ. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली आज सकाळी नाशिक विभागाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त सौरिश सहाय, अपर पोलिस अधीक्षक आदित्य मिरखेलकर (नाशिक ग्रामीण), पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण (नाशिक शहर), नियोजन विभागाचे सहसंचालक योगेंद्र चौधरी, तहसीलदार अमोल निकम आदी उपस्थित होते, तर पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे (धुळे), महेश्वर रेड्डी (जळगाव), श्रवण दत्त (नंदुरबार), अपर पोलिस अधीक्षक वैभव कलबुर्गे (अहिल्यानगर) हे दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून या बैठकीत सहभागी झाले होते.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात महिला भाविकांची संख्या मोठी राहील. या पार्श्वभूमीवर महिलांच्या संरक्षणासाठी पुरेशा उपाययोजना कराव्यात. महिलांसाठी मदत केंद्रे, हिरकणी कक्ष, स्वच्छता गृहांची सुविधा असावी. तसेच दिव्यांगासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, असेही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

महिला अत्याचाराच्या घटनांच्या प्रतिबंधासाठी तालुकास्तरावर भरोसा सेल कार्यरत असतात. ज्या तालुक्यांमध्ये भरोसा सेल नसेल तेथे जिल्हास्तरीय भरोसा सेलच्या माध्यमातून महिलांशी संवाद साधावा. कौटुंबिक संरक्षण कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलिसांनी महसूल अधिकाऱ्यांसमवेत नियमितपणे बैठका घ्याव्यात. पती- पत्नीत समेट झाल्यानंतर या कुटुंबाच्या संपर्कात राहावे. त्यासाठी आवश्यकतेनुसार गृहभेट करावी. अमली पदार्थ प्रतिबंधासाठी उपाययोजना कराव्यात. त्यासाठी अन्न व औषध प्रशासनाची मदत घ्यावी. पोक्सो कायद्यान्वये दाखल गुन्ह्यातील पीडितेचे समुपदेशन करावे.

रेल्वे प्रवासात महिलांशी निगडित काही अप्रिय घटना घडू नये. अशा घटना टाळण्यासाठी रेल्वे व पोलिस दलाने नियमितपणे संवाद साधावा. दक्षता समिती, नागरी हक्क संरक्षण समितीच्य बैठकांमध्ये महिलांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी रिक्षा, शालेय बसची प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या सहकार्याने नियमितपणे तपासणी करावी. तसेच महिला अत्याचाराच्या घटनांचा सखोल तपास करून दोष सिद्धीचे प्रमाण अधिक वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

विशेष पोलिस महानिरीक्षक श्री. कराळे यांनी सांगितले की, विभागातील पाचही जिल्ह्यात महिला अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी पोलिस दलाच्या माध्यमातून विविध उपाययोजन करण्यात येत आहेत. अंमली पदार्थांच्या प्रतिबंधासाठी ड्रोनची मदत घेण्यात येत आहे. ठिकठिकाणी कारवाई करून अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून त्यासाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्या सहकार्याने उपाययोजना करण्यात येत आहेत. पोलिस अधीक्षक श्री. धिवरे, श्री. दत्त, श्री. रेड्डी, श्री. मिरखेलकर, श्री. कलबुर्गी, श्री. चव्हाण यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात महिलांच्या सुरक्षेसाठी पोलिस दलातर्फे सुरू असलेल्या विविध उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली.

# पुणे शहरात साकारणार संविधान उद्यान

## उपमहापौर परशुराम वाडेकरांच्या संकल्पनेला आयुक्तांचा सकारात्मक प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद असलेल्या भारतीय संविधानाच्या संकल्पनेवर आधारित उद्यान महापालिकेच्या उद्यान विभागाच्या वतीने साकारण्यात येणार आहे. उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या या संकल्पनेला महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त संभाजी उद्यान येथे आयोजित करण्यात आलेल्या फुले, फळे आणि भाज्यांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन उपमहापौर वाडेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी सभागृह नेते गणेश बीडकर, मनपा आयुक्त नवल किशोर राम , अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज , बनकर, उद्यान विभागाचे घोरपडे आदि मान्यवर उपस्थित होते.

संपूर्ण देशाचा कारभार सुरळीतपणे चालविणाऱ्या संविधानाची सर्व नागरिकांना, विशेषतः देशाचे भवितव्य असलेल्या विद्यार्थी वर्गाला ओळख व्हावी, संविधानाची मूल्य, संविधानाला नागरिकांकडून असलेल्या अपेक्षा, कर्तव्य आणि अधिकार याची माहिती व्हावी, या दृष्टीने या उद्यानाची उभारणी केली जाणार आहे. सर्वपक्षीय नगरसेवक या प्रस्तावाला मान्यता देतील व या प्रकल्पासाठी निधीची कोणतीही कमतरता पडणार नाही, अशी ग्वाही देखील वाडेकर यांनी दिली.

याच कार्यक्रमात महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी संविधान उद्यान उभारण्यासाठी दोन दिवसात उद्यान विभागाचे प्रमुख घोरपडे यांच्यासह पाहणी करून जागा निश्चित करण्यात येईल, अशी घोषणा देखील केली आहे.

# अवघ्या विश्वाला हेवा वाटेल अशी शिवजयंती साजरी करणार

## अमित गायकवाड यांना ग्लोबल एक्सलन्स पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** पुण्यातील शिवजयंती महोत्सव यंदा शंभराहून अधिक स्वराज्य रथांच्या सहभागासह अवघ्या विश्वाला हेवा वाटेल अशा भव्यतेने साजरा होणार आहे, असे ठाम निर्धार अमित गायकवाड यांनी व्यक्त केला. याबाबत विविध सरदार घराण्यांच्या वतीने त्यांनी महोत्सव समितीच्या प्रवर्तक संस्थापक अध्यक्ष गायकवाड यांना शासनाने सन्मान देण्याची मागणी केली.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल अमित गायकवाड यांना इजिप्तमध्ये 'ग्लोबल एक्सलन्स पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या निमित्ताने म्हात्रे पुलाजवळील स्वराज्यभूमी कृष्णसुंदर गार्डन येथे विविध घराण्यांच्या वतीने गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सभागृहनेते प्रशांत शितोळे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक उल्हास कदम यांच्या हस्ते



कोल्हापूरच्या अंबाबाई मातेची प्रतिमा, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार पार पडला.

शिवजयंती महोत्सवाच्या यशाबाबत गायकवाड म्हणाले, गेल्या १४ वर्षांपासून स्वराज्य कार्य चालू असून, स्वराज्य घराण्यांच्या सहभागासह हा सोहळा जगातील सर्वात मोठा ऐतिहासिक शिवजयंती उत्सव बनला आहे. प्रथम वर्षी सहा रथ होते; आता १०० पेक्षा अधिक रथ सहभागी होत आहेत. हा उत्सव लाल महाल परिसरातून सुरू होतो व जगभरातील शिवभक्तांचे लक्ष वेधतो. त्यांनी शिवराज्याभिषेक दिन ६ जून 'शिवस्वराज्य दिन' आणि स्वतंत्र भारताला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा जाधव यांच्या जन्मदिन १५ जानेवारी 'महाराष्ट्र क्रीडा दिन' म्हणून साजरा करण्यास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिल्याचे सांगितले. गायकवाड यांनी यशाचे श्रेय स्वराज्य घराणी, स्वयंसेवक, माता-भगिनी, सहकाऱ्यांना व कुटुंबीयांना दिले आणि सर्व उपक्रमांचा मान शिवछत्रपतींच्या चरणी अर्पण करण्याचा संदेश दिला. सत्काराचे आयोजन माजी क्रीडा संचालक विजय संतान, शिवाजी साळुंखे, आणि राजेंद्र घुले यांच्या पुढाकाराने पार पडले.

# पोषक वातावरणाने गहू पीक जोमात

## बारामतीच्या पश्चिम भागातील चित्र, शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर, :** बारामती तालुक्यातील पश्चिम भागात यंदा गव्हाच्या पिकाला अत्यंत पोषक वातावरण लाभल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. सोमेश्वरनगर परिसरात सध्या गव्हाची ओंबी दाण्यांनी भरलेली दिसत असून पीक जोमात वाढत आहे. पुढील १० ते १५ दिवसांत मळणीपूर्व कामांना सुरुवात होणार असून काढणीस साधारण महिनाभराचा कालावधी बाकी आहे.

यंदा शेतकऱ्यांनी गोल्डन तेवीस, सरबती, सत्तर, सतर अंकुर केदार अशा विविध गव्हाच्या सुधारित जातींची लागवड केली आहे. नोव्हेंबर महिन्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीची योग्य मशागत करण्यात आली. ट्रॅक्टरच्या



शेतकरी हिंदुराव सकुंडे यांच्या शेतातील जोमात आलेले गहू पीक.

साहाय्याने पेरणी केल्यामुळे उगवण चांगली झाली आणि पिकाची वाढही समाधानकारक झाली आहे.

सध्या गव्हाच्या प्रत्येक ओंबीत साधारण ६० ते ७० किंवा त्याहून अधिक दाणे भरलेले दिसत आहेत. त्यामुळे उत्पादनात वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यंदा एकरी १८ ते २० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळेल, असा शेतकऱ्यांचा अंदाज आहे. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात गहू काढणीला येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.सोमेश्वरनगर परिसर हा सोमेश्वर साखर कारखाना मुळे ऊस बागायत पट्टा म्हणून ओळखला जातो. मात्र काही युवा शेतकऱ्यांनी ऊसाबरोबरच गव्हासारखे पर्यायी पीक घेण्याचा प्रयोग केला असून त्यातून सकात्मक परिणाम दिसून येत आहेत.यंदा हवामान अनुकूल राहिल्याने गव्हाचे विक्रमी व चांगले उत्पादन मिळेल, अशी माहिती सोमेश्वरनगर येथील प्रगतिशील शेतकरी हिंदूराव सकुंडे यांनी दिली. एकूणच, अनुकूल हवामान व आधुनिक शेती पद्धतीमुळे बारामतीच्या पश्चिम भागात गव्हाचे पीक भरघोस येण्याची चिन्हे दिसत आहेत.


## बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, बारामती. ता. बारामती जि.पुणे.

१०१६/२०२६    दि.१४/०२/२०२६

(फक्त सभासद संस्थांकरीता)

प्रति,
मा. चेअरमन सचिव सो.,
सह. दूध उत्पा. संस्था मर्या.
त. बारामती जि.पुणे.

विषय : संचालक सदस्यांच्या रिक्त जागेसाठी प्रतिनिधींचे नावाचा अर्ज पाठविणेबाबत.....

संदर्भ : जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दूग्ध) पुणे विभाग पुणे यांचे पत्र जा. क्रं.प्रादुविअ/क-१/बारामती तालुका/दूध संघ संचालक निवड/आदेश/२३५/२०२६ दि.१२ फेब्रुवारी २०२६.

महोदय,

आपले संघाचे संचालक मंडळाची सन २०२२-२३ ते २०२७-२८ या निवडणूक कालावधीकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी प्राधिकरण यांचेमार्फत रितसर पार पडलेली आहे. सदर संचालक मंडळामध्ये एक जागा रिक्त आहे.

| पो.नि.कं. | मतदार संघ | जागा |
|---|---|---|
| १४.४ | सभासद प्राथमिक दूध संस्थांचे महिला प्रतिनिधी | ०१ |

वरील रिक्त जागा उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार इच्छूक सभासदांचे अर्ज घेवून, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) व नियम ७४ अन्वये प्राप्त अधिकारानुसार संघाचे संचालक मंडळ सभेत भरावयाची आहे. तरी सदर रिक्त जागांसाठी इच्छूक, पात्र सभासद संस्थांनी आपले पात्र प्रतिनिधींचे नावाचे अर्ज दि. २३/०२/२०२६ पूर्वी संघाचे मुख्य कार्यालयात जमा करावेत. अर्जात संस्थेचे नांव, पत्ता, फोन नं. तसेच प्रतिनिधीचे नांव, पत्ता, जन्मतारीख, वय, आधारकार्ड, पॅनकार्ड इ.च्या सत्य प्रति, मोबाईल नंबर, संस्थेचा सध्याचा दूध पुरवठा, प्रतिनिधीचा संस्थेस दूध पुरवठयाबाबतचा दाखला इत्यादी सत्यप्रतिसह महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) व नियम ७४ मधील तरतूदीनुसार संचालक होण्यास अपात्र नाही याचे घोषणापत्र इ कागदपत्रे जोडावीत.

संचालक सदस्यांच्या वरील रिक्त जागेसाठी महिला प्रतिनिधी मतदार संघातील प्राथमिक दूध संस्थाचे प्रतिनिधी करीता आवश्यक असणारी संघ पोटनियमानुसार पात्रता खालीलप्रमाणे.

५.१ अ) क्रियाशिल सभासद क्रियाशिल सभासद म्हणजे अशी सभासद संस्था जी संघाला मागील पाच वर्षात दरवर्षी किमान १८० दिवस प्रतिदिन किमान २०० लिटर दूधाचा पुरवठा करेल आणि मागील सलग पाच वर्षात किमान एकदा अधिकमंडळाची बैठकीस सभासद संस्थेचा प्रतिनिधी हजर असणे आवश्यक आहे. केवळ कियाशिल सभासदालाच निवडणूकीत मतदानाचा अधिकार राहील. त्याच प्रमाणे कियाशिल सभासदाची नोंद वही प्रतिवर्षी तयार करणे आवश्यक राहील. जो सभासद वरील अटीची पूर्तता करित नसेल अशा सभासदांचे वर्गीकरण अकियाशील सभासद म्हणून करण्यात येईल.

वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचाच संचालक मंडळ सदस्यासाठी विचार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**व्यवस्थापकीय संचालक    चेअरमन**

**बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, बारामती.**

# वांगदरी परिसरात राज्य उत्पादन शुल्कची कारवाई

## १०.५६ लाखांचा मुद्देमाल नष्ट





प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथक अहिल्यानगर यांनी दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी मदनेवाडी/डोंमाळवाडी (वांगदरी परिसर) येथे मोठी कारवाई करत लाखो रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला. गुन्हे दाखल केले असून त्यातील आरोपी फरार झाले आहेत.

तालुक्यातील वांगदरी येथील मदनेवाडीडोंमाळवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात हातभट्टी (गावठी )दारू तयार केली जात असून ती विक्रीसाठी शेजारच्या जिल्ह्यात जात असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून अहिल्यानगर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाला मिळताच त्यांची अचानक तालुक्यातील वांगदरी येथील मदनेवाडीडोंमाळवाडी परिसरात छापा टाकला असता त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गावठी दारू तयार केली जात असल्याचे त्याच्या निदर्शनास आले त्यांनी तेथील कारवाईदरम्यान तब्बल ११,८०० लिटर रसायन आणि १,९२५ लिटर गावठी दारू असा साठा आढळून आला. एकूण १०,५६,५०० रुपयांचा मुद्देमाल घटनास्थळीच नष्ट करण्यात आला.त्याचेवर दोन स्वतंत्र गुन्हे नोंद करण्यात आले आहेत त्यामुळे धंदा मोठा, पण कायद्याची पकड त्याहून मोठी! असे म्हणावे अशी ही कारवाई ठरली. आरोपी मात्र कारवाईपूर्वीच पसार झाले असून त्यांचा शोध सुरू आहे.कारवाईत सहभागी अधिकारी व कर्मचारी यामध्ये सुरज कुसळे (निरीक्षक), आनंद जाधव ( दुय्यम निरीक्षक),जवान सुरज पवार, सिद्धांत गिरिगोसावी, प्रथमेश पंडित, पांडुरंग गदादे,अर्चना दहिफळे(महिला जवान) यांचा समावेश होता अवैध दारू निर्मिती व साठ्याविरोधात विभागाने घेतलेली ही कारवाई ग्रामीण भागातील बेकायदेशीर हालचालींवर कडक संदेश देणारी ठरली आहे.त्यामुळे अश्या कारवाया कायम सुरूच राहतील अशी माहिती अहिल्यानगर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून देण्यात आली आहे.

# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. प्रकाश साळवे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** रयत शिक्षण संस्थेच्या नामांकित महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय श्रीगोंदा येथे प्रभारी प्राचार्यपदी प्रो. डॉ. प्रकाश निवृत्ती साळवे यांची नियुक्ती झाली आहे. ते महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात उपप्राचार्य व भूगोल विभाग प्रमुख काम पाहत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भूगोल विषयाचे पीएच.डी.चे ते मार्गदर्शक आहेत. संशोधनाची दृष्टी असणारे ते संशोधक अभ्यासक आहेत. त्यांनी सहा ग्रंथांचे लेखनही केले आहे. त्यांच्या नावावर दोन पेटंट प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त जर्नलमध्ये विविध विषयांवर संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी तज्ज्ञ व्यक्ती म्हणून भाग घेतला आहे.

या निवडीबद्दल कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, परिक्रमा संकुलाच्या प्रमुख डॉ. प्रतिभाताई पाचपुते, उपनगराध्यक्ष अलकाताई अनभूले, प्राचार्य दिलीप भुजबळ, माजी प्राचार्य डॉ. महादेव जरे, डॉ.अनिल घोडके,रयत संकुलाचे सर्व शाखाप्रमुख, शिक्षणप्रेमी नागरिक, उपप्राचार्य, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक इत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले. व त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जि.प. शाळा सांगवी दुमालच्या शिरपेचात मानाचा तुरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव :** नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत जि.प. प्राथमिक शाळा सांगवी दुमाला येथील लहान गटातील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या दैदीप्यमान यशाबद्दल शाळा व गावाच्या वतीने विजयी खेळाडूंचा भव्य सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

या सत्कारप्रसंगी खेळाडूंना फेटे बांधून, पुष्पहार घालून, वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली असून सन्मानचिन्ह देऊन गुणवंत खेळाडूंचा यथोचित गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक मा. हराळ सर यांनी मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविकाने केली.

कार्यक्रमास काष्टी बीटचे विस्ताराधिकारी श्री. बोरुडे, केंद्रप्रमुख भुकन, केंद्रशाळेचे मुख्याध्यापक येवले, शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष ढगे, संगमेश्वर विद्यालयाचे प्राचार्य व शिक्षकवृंद, काष्टी केंद्रातील विविध शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. तसेच सांगवी दुमाला गावचे सरपंच राजेंद्रजी रणपिसे, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे अध्यक्ष व सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निलेश नलगे व सदस्य, पालक, ग्रामस्थ, महिला भगिनी व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या भाषणातून खेळाडूंच्या जिद्दीचे, मेहनतीचे व शिस्तबद्ध सरावाचे कौतुक केले. शून्य ते विश्व कष्टाला कष्टाची जोड मिळाली की यश निश्चित मिळते. आमच्या लेकींनी जिल्ह्याच्या मैदानावर गाजवलेला पराक्रम संपूर्ण गावासाठी अभिमानास्पद आहे, असे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले.

सत्कारानंतर शाळेच्या प्रांगणात आनंदी बाजार भरविण्यात आला. विजेत्या संघातील सर्व खेळाडू व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले. ही यशाची परंपरा अशीच अखंड सुरू राहो व भविष्यात राज्य व देशपातळीवर शाळेचे नाव उज्ज्वल व्हावे, अशा शुभेच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

## जीवनात कष्ट हेच यशाचे खरे गमक : नजन

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव- ने येथील नवजीवन माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण व भावूक वातावरणात पार पडला. शालेय जीवनाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण करून भविष्यातील स्वप्नांच्या दिशेने झेप घेणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी शाळेच्या वतीने स्नेहपूर्वक निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पागर होते. संस्थेचे प्रशासकीय के. वाय. नजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करताना जीवनात कष्टाला पर्याय नाही हे प्रभावी शब्दांत पटवून दिले. मेहनत, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावरच यश मिळते, असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य कोलते सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिस्त, अभ्यास आणि मूल्यसंस्कार यांचे महत्त्व अधोरेखित केले. दहावीचे वर्गशिक्षक खरात यांनी सादर केलेल्या गीताने संपूर्ण वातावरण भावूक झाले. विद्यालयाचे प्राचार्य खैरे सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# श्रीगोंदा रस्ते आदर्श तालुका होण्याच्या दिशेने वाटचाल

## उक्कडगाव-येळपणे शिव रस्त्याचे सीमांकन पूर्ण



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील उक्कडगावयेळपणे (गणपती माळ) शिव रस्त्याचे सीमांकन दिनांक ६ फेब्रुवारी रोजी यशस्वीरीत्या सीमाकन तहसीलदार सचिन डोंगरे साहेब भूमी उपाधीक्षक अविनाश मिसाळ साहेब यांच्या आदेशाने व दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. मोजणी अधिकारी कल्याण शिंगाडे साहेब व वासुदेव पाटील यांच्याकडून सदर सीमांकन प्रक्रिया सायंकाळी जवळपास ७:३० वाजेपर्यंत पार पडली.

यापुढील टप्प्यात सिमेंटचे पोल बसवणे व रस्ता खुला करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

या कारवाईवेळी महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले, श्रीगोंदा तालुका चळवळ कृती समिती सदस्य अँड कडूस पाटील, राम अडसरे, जालिंदर कातोरे, बेलवंडी पोलीस ठाण्याचे राजेंद्र भोर व विठ्ठल खरमाळे, तसेच उक्कडगावचे तलाठी चव्हाण भाऊसाहेब यांची उपस्थिती होती.

या ऐतिहासिक कामासाठी दोन्ही गावांचे सरपंच, शेतकरी बांधव यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल चळवळीच्या वतीने सर्वांचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.

## देहेश्वर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**अमरापुर :** घुले शिक्षण संस्थेचे देहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ आज विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना फेब्रुवारी २०२६ च्या एस. एस. सी. परिक्षेसाठी विद्यालयात निरोप समारंभ आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. ह.भ.प हरिश्चंद्र व्यवहारे महाराज प्रमुख पाहुणे नंदु पा भोसले (शा. व्य. समिती अध्यक्ष) बाळासाहेब शिंदे, आनंद गांधी (शि.पा संघ उपाध्यक्ष) हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा इंगावले यांनी सत्कार केला. या प्रसंगी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांनी मनोगतात विद्यालया विषयी व शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शना बद्दल कृतज्ञता व्यक्त करतांना भावनिक होवून अश्रू अनावर झाले वाघमारे, नंदु पा भोसले, बाळासाहेब शिंदे, मुख्या केदार (जि.प.शाळा) यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थी जीवनातील अनुभव सांगून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक बाळासाहेब तुपविहिरे, विकास राऊत, प्रमिला बोडखे मॅडम, भाऊसाहेब बर्डे, विशाल जोशी, विकास व्यवहारे, देविदास आरगळे, गोरख लिंभोरे, जिजा पा भोसले, अंबादास मगर दत्तात्रय भोसले आनंद गांधी पालक विद्यार्थी उपस्थित होते.

## द·ख·ल



### योग वेदांत सेवा समितीतर्फे मातृ-पितृ पूजन दिवस साजरा

**सोनई :** हिंदू संस्कृती परंपरेनुसार सरस्वती प्रतिमेचे पूजन व दिपप्रजोलन मान्यवरच्या हस्ते करण्यात आले. आई-वडिलांबद्दल आदर, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी किडस किंगडम अॅकॅडमी शाळेमध्ये मातृ पितृ पूजन दिवस मोठ्या उत्सहाहात साजरा करण्यात आला. मुलांनी आपल्या पालकांना तिलक लावून, फुले अर्पण करून पूजन केले.

मुलांना आपल्या संस्कृतीची ओळख करून देणे, आई-वडिलांचा सन्मान करणे आणि पाश्चात्य संस्कृतीपासून दूर ठेवणे या उद्देशाने आज हा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रम योग वेदांत सेवा समितीचे सदस्य संदीप चोथे (राहुरी ), शिवाजी शेळके (अ. नगर ), सुनील कुसळकर (सोनई), सुरेश लष्करे (सोनई) , पिराजी कुसळकर, संजय गर्जे, अरुण घावटे, कृष्णा सुद्रिक व शाळेच्या मुख्याध्यापिका कीर्ती बंग यांच्या उपस्थितिमध्ये आनंदात पार पडला.

### चार वर्षांच्या रियांशी राठीचा जागतिक विक्रम




**नगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील केडगाव येथील द क्ले प्री-स्कूल या पूर्वप्राथमिक शाळेतील नर्सरी वर्गात शिकणाऱ्या अवघ्या चार वर्षांच्या रियांशी राठी हिने हनुमान चालीसा व पवित्र संस्कृत श्लोकांच्या पठणात उल्लेखनीय प्राविण्य सिद्ध करत जागतिक विक्रमाची नोंद केली आहे. तिच्या या अभिमानास्पद कामगिरीची दखल घेत इन्फ्लुएन्सर बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या जागतिक विक्रम नोंद संस्थेने तिला सन्मानपत्र प्रदान करून गौरवले आहे.

रियांशीने अवघ्या चार मिनिटे चाळीस सेकंदांत संपूर्ण हनुमान चालीसा शुद्ध उच्चार, अचूक लय आणि आत्मविश्वासाने सादर करून परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. याचबरोबर यंग अचिव्हर्स ओलंपियाड या राष्ट्रीय पातळीवरील बौद्धिक स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक पटकावून आपली स्मरणशक्ती व बुद्धिमत्ता सिद्ध केली आहे.

विशेष म्हणजे रियांशी अडीच वर्षांची असल्यापासून हनुमान चालीसा व विविध संस्कृत श्लोकांचे नियमित पठण करत आहे. तिच्या यशामागे आई रोशनी जाजू (राठी), आजी ललिता जाजू, आजोबा राजेंद्र जाजू तसेच शाळेच्या संचालिका सुजाता पठारे व मुख्याध्यापिका नम्रता भंडारी यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे.

### वचन संस्कृती वृध्दींगत व्हावी : अनिल मडके

**ढोरजळगांव :** विद्यार्थाना वाचनाची आवड निर्माण व्हावी व वाचन संस्कृतीचे जतन व्हावे यासाठी विद्यार्थानी थोर पुरुषांचे लेख वाचून ते आत्मसात करावेत व वाचन संस्कृती वृध्दींगत व्हावी यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेले कुसुमाग्रज वाचनालयाचे उद्घाटन हे निश्चित भविष्यात विद्यार्थासाठी फलदायी असल्याचे प्रतिपादन कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अनिल मडके यांनी बोलताना व्यक्त केले. शहरटाकळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून कुसुमाग्रज वाचनालयाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष देविदास चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष अरूण चव्हाण, राजेंद्र खंडागळे, गणेश वसेकर,सोम नाथ लद्दे,योगेश राजळे,शाळेचे मुख्याध्यापक अंकुश फुंदे,रमेश गायकवाड, राजाभाऊ इंगळे, रमजान शेख, अश्विनी निकाळजे, वनिता बल्फे आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंचायत समितीच्या कारभारावर आ. मोनिका राजळेंची जाहीर नाराजी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** आज पाथर्डी तहसील कार्यालयात आमदार मोनिका राजळे यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पंचायत समितीच्या सर्वच विभागांच्या कामकाजावर आमदार राजळेंनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली. बैठकीत मांडण्यात आलेल्या प्रत्येक विभागाच्या तक्रारीवर अधिकाऱ्यांनी नेमकी काय कारवाई केली, कोणती कामे पूर्ण केली याचा सविस्तर लेखी अहवाल आठ दिवसांत आमदार कार्यालयाकडे सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले. भगवानगड पाणी योजना, जलजीवन मिशन व जीवन प्राधिकरणाशी संबंधित अधिकारी व ठेकेदारांची स्वतंत्र संयुक्त बैठक लवकरच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद भंडारी यांच्या समवेत घेण्यात येणार असल्याची माहितीही आमदार राजळेंनी दिली.

या बैठकीस प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, नायब तहसीलदार दिग्विजय पाटील, किशोर सानप, नगराध्यक्ष अभय आव्हाड, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता राहुल कांबळे, जलसंधारणचे आनंद रुपनर, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. सचिन दरंदले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भगवान दराडे, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंता चेमटे, महावितरणचे मयूर जाधव, वनविभागाचे घनवट, भूमी अभिलेख उपअधीक्षक निखिल मोरे, पोलिस उपनिरीक्षक संदीप ढाकणे, भाजप तालुकाध्यक्ष धनंजय बडे, बंडूशेठ बोरुडे, अमोल गर्जे, पुरुषोत्तम आठरे, भगवान साठे, रवींद्र वायकर, सुनील ओव्हाळ, शेषराव कचरे, रवींद्र आरोळे, पांडुरंग लाड, चारुदत्त वाघ, अंकुश कासुळे, बाबा राजगुरू, परमेश्वर टकले यांच्यासह तालुक्यातील सरपंच व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




बैठकीत भगवानगड पाणी योजनेचे काम अत्यंत संथगतीने सुरू असून त्यामध्ये अनियमितता असल्याचा आरोप करण्यात आला. निधी खर्च झाला तरी गावांना पिण्याचे पाणी कधी मिळणार, असा थेट सवाल उपस्थित करण्यात आला. जलजीवन मिशनच्या कामांबाबतही गंभीर तक्रारी मांडण्यात आल्या. कोट्यवधी रुपये खर्च होऊनही मोजक्याच गावांपर्यंत पाणी पोहोचल्याचे चित्र समोर आले. कुठे पाइपलाइन आहे तर टाकी नाही, जिथे टाकी आहे तिथे वीज जोडणी नाही, अशा विसंगतींमुळे योजनांचा लाभ प्रत्यक्षात पोहोचत नसल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय महामार्गावरील खड्ड्यांबाबत अधिकारी उपलब्ध नसल्याची तक्रार खुद्द प्रांताधिकाऱ्यांनीच बैठकीत मांडली. यावर आमदार राजळेंनी संबंधित अधिकाऱ्यांना थेट संपर्कात राहण्याचे निर्देश देत आपले क्रमांक सेव्ह करण्यास सांगितले. कारेगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीतील अवैध गौण खनिज उत्खननाच्या मुद्द्यावर अधिकारी ठोस उत्तर देऊ न शकल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली.

पंचायत समितीच्या बांधकाम विभागाकडील शाळा दुरुस्ती व रस्त्यांची कामे अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाची होत असल्याचे निदर्शनास आणून दिल्यावर, कामांची प्रत्यक्ष भेट देऊन ऑडिट झाल्याशिवाय बिले अदा करू नयेत, असे स्पष्ट आदेश आमदार राजळेंनी दिले. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील काही अधिकाऱ्यांनी काम न करताच बिले काढल्याचा प्रकार माळीबाबुळगाव ते धामणगाव रस्त्याच्या

**पंचायत समितीच्या कामकाजाबाबत तालुक्यातील कार्यकर्त्यांनी अडचणींचा डोंगर आणि तक्रारींचा पाढाच बैठकीसमोर मांडला. मी पंचायत समितीच्या कारभारावर समाधानी नाही. कामकाजात तातडीने सुधारणा करा, अन्यथा आम्हाला वेगळा निर्णय घ्यायला लावू नका, असा इशारा आमदार मोनिकाताई राजळे यांनी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी दत्तात्रय रानमळ यांना जाहीर भाषणातून दिला. आढावा बैठकीचे पत्र देऊनही गटविकास अधिकारी अनुपस्थित राहणे ही बाब गंभीर असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले.**

# दैनिक राष्ट्र सह्याद्री


## आज महाशिवरात्रीनिमित्त किर्तन व महाप्रसादाचे वाटप

**टाकळीभान :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी टाकळीभान येथील पंचक्रोशीतील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेले शंभू महादेव मंदिर येथे



आज आई रविवार दि.१५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. महाशिवरात्री निमित्त सकाळी ९ ते ११ वाजता,राष्ट्रीय कीर्तनकार सचिन महाराज ढोले यांचे जाहीर हरि किर्तन होणार आहे. तदनंतर महाशिवरात्र निमित्त समस्त देणगीदारांकडून सुमारे एक हजार किलो साबुदाणा खिचडी महाप्रसाद व केळी आदी फराळांचा वाटपाचा कार्यक्रम शंभू महादेव मंदिराच्या भव्य प्रांगणात संपन्न होणार आहे.तरी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले.



### जिल्हा बँक मातृसंस्था म्हणून

# जिल्ह्याच्या विकासात पाठीशी : माजीमंत्री थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर :** सहकार चळवळ मजबूत करत पीक कर्जाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधार देण्याचे म हत्त्वाचे काम जिल्हा सहकारी बँकेने केले आहे. आज बँकेत असलेले ११ हजार कोटी रुपयांचे ठेवी हे जनतेच्या विश्वासाचे प्रतीक असून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात जिल्हा बँक मातृसंस्था म्हणून कायम पाठीशी उभी राहिली आहे, असे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय कमिटीचे सदस्य तथा माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक यांच्या संगमनेर शाखेतील तालुका विकास अधिकारी कार्यालयाच्या नूतनीकरण उद्घाटन समारंभात ते बोलत होते. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले होते. यावेळी व्यासपीठावर व्हा. चेअरमन ड. माधवराव कानवडे, दुर्गाताई तांबे, रणजीतसिंह देशमुख, पांडुरंग पाटील घुले, संचालक गणपतराव सांगळे, बाळासाहेब साळुंखे, शेती संघाचे चेअरमन संपतराव डोंगरे, आर. बी. राहणे, अजय फटांगरे, सुरेश थोरात, दीपक भोसले, अ‍ॅड. नानासाहेब शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे, तालुका विकास अधिकारी अशोक थोरात, कार्यालयीन अधीक्षक चेतन देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सभागृहाच्या नूतनीकरण कामाचे उद्घाटन करण्यात आले.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी ४४ वर्ष संचालक म्हणून काम करताना १८ वर्षे व्हा. चेअरमन व चेअरमन पदाची जबाबदारी सांभाळली. शिस्त व पारदर्शकता त्यांनी सहकारात रुजवली. गावपातळीवरील सेवा सोसायट्या सक्षम करण्याबरोबरच सचिवांविषयी त्यांची कायम तळमळ होती. संगमनेर शाखेच्या इमारतीचे भूमिपूजन २९ जुलै १९७६ रोजी माझे आजोबा संतोजी थोरात यांच्या हस्ते झाले. गेल्या पन्नास वर्षांत मोठा बदल झाला असून बँकेने शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे.

त्यामुळेच आज बँकेत ११ हजार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. संगमनेर तालुक्यात कर्ज देणे व वसुलीची सुदृढ संस्कृती कायम आहे, असेही त्यांनी नमूद केले.

### जिल्हा बँकेने अभ्यास गट करावा

शेतकऱ्यांची अवस्था, यापुढील पीक पद्धती, ऊस पीक याबाबत बँकेकडून एक अभ्यास कट करावा. याचबरोबर अमेरिका आणि भारत यांच्यात नव्यान होत असलेल्या कराराबाबतही अभ्यास झाला पाहिजे. अमेरिकेमधून भारतामध्ये येणाऱ्या शेतीमाल व वस्तूंवर कोणताही कर नाही मात्र भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूंवर कर असणार आहे .या नवीन धोरणाबाबत बँकेने अभ्यास करावा असेही माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले.

# श्रीरामपुरात २७ फेब्रुवारीपासून पुन्हा अतिक्रमण मोहीम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरात अतिक्रमणविरोधी कारवाई पुन्हा वेग घेणार असून पाटबंधारे विभागाने अंतिम नोटिसा बजावल्या आहेत. श्रीरामपूर शहरातील वराह पैदास केंद्र ते सरस्वती कॉलनी या परिसरात मेन कॅनॉलच्या कडेला झालेली अतिक्रमणे हटविण्यासाठी २७ फेब्रुवारीपासून मोठ्या पोलीस बंदोबस्तात मोहीम राबविण्यात येणार आहे.

पालिका प्रशासनाने यापूर्वी शहरातील विविध भागांत अतिक्रमण काढल्यानंतर बेलापूर रोड, संगमनेर रोड व नेवासा रोड परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागानेही आपल्या हद्दीतील अतिक्रमणे हटविली होती. आता पाटबंधारे विभागाने आपल्या हद्दीतील अतिक्रमणांकडे लक्ष केंद्रित केले आहे. मेन कॅनॉलच्या वराह पैदास केंद्र ते सरस्वती कॉलनी दरम्यान सुमारे ३५० ते ३७५ अतिक्रम णधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आलेली अतिक्रमण मोहीम दिवाळी, शारदोत्सव व गणपती उत्सवामुळे तात्पुरती थांबविण्यात आली होती. मात्र आता वरिष्ठांच्या निर्देशानुसार नोटिसा देण्यात आल्या असून दि. २६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घ्यावीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. अन्यथा दि. २७ फेब्रुवारीपासून विभागामार्फत अतिक्रमणे हटविण्यात येणार आहेत. दरम्यान, श्रीरामपूर शहर व शिरसगाव हद्दीत अनधिकृत अकृषीक जागेचा वापर करणाऱ्यांवरही कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४५ (२) नुसार ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या अहवालावरून महसूल विभागाने २९३ जणांना नोटिसा बजावल्या आहेत.

# कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या ९ गोवंशीय जनावरांची सुटका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहरातील एरटेल टॉवर शेजारी, सुनिल देवकर यांच्या घरासमोरील रिकाम्या प्लॉटमध्ये, रामनगर वॉर्ड नं.०१ येथे झाडाच्या आडोशाला कत्तलीकरीता बांधुन ठेवलेल्या ९ गोवंशीय जनावरांची सुटका श्रीरामपूर शहर पोलिसांनी केली.

श्रीरामपूर शहरातील एरटेल टॉवर शेजारी, सुनिल देवकर यांच्या घरासमोरील रिकाम्या प्लॉटमध्ये, रामनगर वॉर्ड नं.०१, येथे झाडाच्या आडोशाला कोणतीही चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तल करण्याच्या इरादयाने बांधुन ठेवलेले ४ लाख रुपये किंमतीचे पांढऱ्या रंगाचे आठ गावरान बैल, ५० हजार रुपये किंमतीचे गोवंशीय जातीची एक काळया तांबडया रंगाची गावरान गाय अशी ४ लाख ५० हजार रुपये किंमतीचे गोवंशीय जनावरे पोलिसांना आढळून आली. पोलिसांनी या ९ गोवंशीय जनावरांची सुटका केली.

याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा रजि. क्र. १०७/२०२५ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे सुधारीत कायदा सन २०१५ चे कलम ५, ५ (ब) ९, सह प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंधक करण्याबाबत अधिनियम १९६० चे कायदा कलम ११ (च), ११(ज), ११ (झ) प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# ‘आम्रपाली लॉज अँड बार’मधून देहविक्री रॅकेट उघड; चौघे ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टी बाजारतळ येथील ‘आम्रपाली लॉज अँड बार’मध्ये सुरु असलेल्या अनैतिक व्यवसायावर शुक्रवारी (दि. १३ फेब्रुवारी २०२६) सायंकाळी सुमारे ७.५० वाजता धडक कारवाई करण्यात आली. श्रीगोंदा पोलीस ठाणे आणि अनैतिक मानवी वाहतूक शाखेच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली.

तालुक्यातील काष्टी बाजारतळ येथील ‘आम्रपाली लॉज अँड बार’मध्ये सुरु असलेल्या अनैतिक व्यवसाया बाबत पोलिसांना माहिती मिळाल्यावर नुसार दरम्यान असे आढळले की, आरोपींकडून बाहेरगावाहून महिलांना बोलावून त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली जात होती. ग्राहकांना लॉजवर बोलावून पैशांच्या मोबदल्यात देहविक्रीचा व्यवसाय चालविला जात असल्याचा आरोप आहे. या व्यवसायातून मिळणाऱ्या रकमेवर आरोपींची उपजीविका चालत असल्याचे पोलिसांनी नमूद केले त्यानुसार पोलिसांनी १३ फेब्रुवारीच्या सायंकाळी ७ चे सुमारास बनावट ग्राहक पाठवून पडताळणी करत खात्री झाल्यावर छापा मारला असता त्या ठिकाणी अनैतिक देहविक्री रॅकेट सुरु असल्याचे उघड झाले आहे या ठिकाणाहून ताब्यात घेतलेले आरोपी मध्ये रणजित राम पुजारी (व्यवस्थापक)मकेशकुमार गुरुदयाल यादव,नागनाथ लक्ष्मण इंगळे,ज्ञानेश्वर रमेश मुळीक (ग्राहक)यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून या ठिकाणाहून कारवाईदरम्यान एकूण २२,५४० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यामध्ये विविध कंपन्यांचे मोबाईल फोन,सिम कार्ड,रोख रक्कम,कंडोम पॅकेट्स यांचा समावेश आहेतेथील महिलांची पोलिसांनी सुटका करून त्यांची वैद्यकीय तपासणी व आवश्यक प्रक्रिया सुरू केली आहे काष्टी बाजारपेठेत झालेल्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १४३, ३(५) तसेच अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम १९५९ चे कलम ३, ४, ५, ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सोपान शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलिसांकडून अशा प्रकारच्या अनैतिक व्यवसायांविरुद्ध पुढील काळातही कठोर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

### राजाश्रय बाबत चर्चा ?

तालुक्यातील काष्ठी या ठिकाणी अनेक ठिकाणी गुटखा ,मटका,दारू वेश्या व्यवसाय यासारख्या अनेक अवैध धंद्यांना मोठ्या प्रमाणात ऊत आला असून या सर्व अवैध धंद्यांना राजाश्रय असल्याची जोरदार चर्चा ऐकण्यास मिळत होती.

### श्रीगोंदा पोलिसांच्या कार्यपद्धतीवर शंका?

तालुक्याच्या राजधानीत एवढा मोठा वेश्या व्यवसाय सुरु होता याबाबत श्रीगोंदा पोलिसांना कसा थांगपत्ता नव्हता की, चेरीमीरी साठी त्याकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले जायचे यामुळे श्रीगोंदा पोलिसांच्या कार्यपद्धतीवर जनतेला मोठ्या प्रमाणात शंका असल्याचे जनमाणसात बोलले जात आहे.

# देशी बनावटीची पिस्टुल बाळगणाऱ्या आरोपीस अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** देशी बनावटीची पिस्टुल बाळगणा-या आरोपीस नेवासा पोलिसांनी ३ जिवंत काडतुसेसह पकडले असून नेवासा पोलीसांची दमदार कारवाईने

समाधान व्यक्त केले जात आहे.पिस्टुल बाळगणा-या आरोपीस ३ जिवंत काडतुसे मॅगझीन, एक मालवाहू वाहन असा एकुण ४,५०,९०० रु किमतीच्या मुददेमालासह पोलिसांनी आरोपीस जेरबंद केले आहे

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की कुकाणा गावात नेवासा फाटा ते शेवगाव जाणारे रोडवर कुकाणा दुरक्षेत्रा समोर एक सुझुकी कंपनीच्या गाडी क्रमांक एम.एच. १६ सी.डी. ४४०५ मधील एका इसमाकडे एक देशी बनावटीचे पिस्तुल आहे अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने पोहवा शहाजी आंधळे यांनी लागलीच मिळालेली माहीती वरिष्टांना कळवुन कुकाणा दुरक्षेत्र येथे दोन पंचांना बोलावुन कुकाणा दुरक्षेत्र येथील पोशी अमोल डमाळे, होम बाळु सावंत, होम प्रशांत चव्हाण, होम चंद्रकांत घाडगे, होम श्रीधर लिपणे, अशांना बोलावुन मि ळालेल्या माहीती थोडक्यात सांगुन माहीतीची खात्री करण्यासाठी कुकाणा येथील तरवडी चौक येथे सापळा रचुन थांबले मिळालेल्या माहीती प्रमाणे एक मालवाहु वाहण क. एम.एच. १६ सी.डी. ४४०५ असे तरवडी चौकात आले असता त्यास आम्ही थांबवुन पंचासमक्ष त्यातील चालकाला त्यास त्याचे अंगझडती घेण्याचा कायदेशीर उददेश सांगुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव १. संतोष कारभारी नरोटे वय. २२ वर्ष रा. मोहरी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर असे सांगुन त्याची अंगझडती घेतली असतात्याचे कमरेलाएक देशी बनावटीचे पिस्तुल मॅगझीनसह मिळून आले पंचासमक्ष मॅगझीन खोलुन पाहिले असता त्यामध्ये तिन जिवंत काडतुस मिळुन आल्याने नमुद आरोपीस पिस्तुल वे परवाना बाबत विचारपुस केली असता त्याने काहीएक सम ाधानकारक उत्तर दिले नाही. नमुद आरोपीने सदरचे गावठी बनावटीचे पिस्तुल बेकायदेशीर पणे स्वतःचे कब्जात बाळगल्याची खात्री झाल्याने नमुद आरोपीचे ताब्यातुन जप्त करण्यात आलेल्या मुददेमालाचे वर्णन :- १. ५०,००० रु कि.चा एक स्टील सारखे धातुचा त्यास ग्रउन रंगाची ग्रीप असलेला गावठी पिस्टल त्यास बेरेल, मॅक्झीन, ग्रीप, टिंगर असलेला गावठी बनावटीचा। पिस्टल जु.वा.कि.अं २.९०० रु कि.चे तिन जिवंत काडतुस जु.वा.कि.अं ३.४,००,००० रु कि. चे एक सुझुकी कंपनीची सुपर कॅरी सी.एन. जी मॉडेल ची मालवाहतुक गाडी कु. एम.एच. १६ सीडी ४४०५ अशी जु.वा.कि.अं एकुण ४,५०,९०० रु येणे प्रमाणे वरील वर्णनाचा व किमतीचा मुददेमालदोन पंचासमक्ष जप्त करुन आरोपी नामे संतोष कारभारी नरोटे वय. २२ वर्ष रा. मोहरी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर याचे विरोधात पोशी अमोल डमाळे यांनी नेवासा पोलीस स्टेशन येथे गु. रनं १११/२०२६ शस्त्र अधिनीयम कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे अहिल्यानगर,अप्पर पोलीस अधिक्षक श्रीराम पुर सोमनाथ वाकचौरे,अप्पर पोलीस अधिक्षक अहिल्यानगर वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शेवगाव निरज राजगुरु यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. महेश पाटील, सपोनि अमोल पवार, पोसई अहिरे, पोहवा शहाजी आंधळे, पोशी अमोल डमाळे, पोशी संदीप ढाकणे, होम बाळु सावंत, होम प्रशांत चव्हाण, होम चंद्रकांत घाडगे, होम श्रीधर लिपणे, यांनी केली असुन नमुद गुन्हयातील आरोपी अटक करण्यात आला आहे. असुन पुढील तपास सपोनि अमोल पवार हे करीत आहे.






# अप्पर पोलीस अधीक्षकांच्या निर्णयानंतर मृतदेहावर अंत्यसंस्कार

## रुग्णवाहिकेसह मृतदेह थेट पोलीस ठाण्यात, नातेवाईकांनी दिला १५ तास ठिय्या







**संगमनेर खुर्द येथील वैदू समाज बांधवांनी आ. अमोल खताळ यांची शासकीय विश्राम गृहवर भेट घेऊन हा मृत्यू अपघाती नसून घातपात असल्याचा संशय व्यक्त केला. त्यानंतर आ. खताळ यांनी पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्याकडून माहिती घेतली असता घटना मध्यरात्री घडली आहे. त्यामुळे अपघाताची नोंद केली आहे. शव विच्छेदन अहवाल आल्यानंतरच या मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे, असे पोलीस प्रशासनाने सांगितले आहे. तरी नातेवाईक ऐकण्याच्या तयारीत नाही त्यांनी पोलीस ठाण्यातच ठाण मांडले आहे.**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील संगमनेर खुर्द येथील वैदुवाडी परिसरात राहणाऱ्या सुरज शिंदे यांच्या मृत्यूवरून शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. हा अपघात नसून खून असल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त करत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.

सुरज शिंदे यांचे शवविच्छेदन नाशिक जिल्हा रुग्णालय येथे करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी नाशिक येथून मृतदेह रुग्णवाहिकेतून थेट संगमनेर शहर पोलीस ठाणे येथे आणण्यात आला. जोपर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मृतदेह हलवणार नाही, असा ठाम निर्णय नातेवाईकांनी घेतला होता. पोलिसांनी वेळीच गुन्हा दाखल केला नाही तर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. मृतदेह रुग्णवाहिकेसह पोलीस ठाण्यात आणल्याने वातावरण चांगलेच तापले होते.

नातेवाईक आपल्या निर्णयावर ठाम होते. परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेता श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, यांनी तातडीने संगमनेर येथे धाव घेतली. त्यांनी नातेवाईकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.

मात्र, गुन्हा दाखल झाल्याशिवाय मृतदेह हलवणार नाही, या भूमिकेवर नातेवाईक ठाम होते. त्यानंतर आ. अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांनीही शहर पोलीस ठाण्या मध्ये येऊन नातेवाईकांची समजूत काढली. मृतदेहाची अवहेलना करू नका करता अंत्यसंस्कार करण्याचे आवाहन करत, फिर्याद दाखल करण्यासाठी या, गुन्हा दाखल केला जाईल असे आश्वासन दिल्यानंतर. तब्बल १५ तासांनंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेऊन अंत्यविधीसाठी नेला. दुपारी संगमनेर खुर्द येथील अमरधाम येथे शोकाकुल वातावरणा मध्ये सुरज शिंदे याच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, या प्रकरणी पुढील तपास सुरू असून पोलिस प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.